# बृहन्मुंबई महानगरपालिका

## कार्यानुरुप अहवाल
## २०२३-२०२४

## सार्वजनिक आरोग्य खाते

(प्रतिबंधात्मक, रोगनिवारक आणि सुधारणात्मक उपाय)

(कार्यकारी आरोग्य अधिकारी यांनी सादर केल्याप्रमाणे)

NS5174CA-BMPP-67134-2023-24-10 Copies

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## कार्यानुरुप अहवाल
## २०२३-२०२४

# सार्वजनिक आरोग्य खाते

( प्रतिबंधात्मक, रोगनिवारक आणि सुधारणात्मक उपाय )

(कार्यकारी आरोग्य अधिकारी यांनी सादर केल्याप्रमाणे)

# बृहन्मुंबई महानगरपालिका

**कार्यानुरुप अहवाल २०२३-२०२४**

# सार्वजनिक आरोग्य खाते

( प्रतिबंधात्मक, रोगनिवारक आणि सुधारणात्मक उपाय)

**अनुक्रमणिका**


| अनु. क्र | विभागाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | सर्वसाधारण (सामान्य) प्रशासन | ०१-०३ |
| २. | साथरोग | ०४-१० |
| ३. | विस्तारीत लसटोचणी कार्यक्रम (विलका) | ११-१७ |
| ४. | किटकनाशक विभाग | १८-२५ |
| ५. | हिवताप संनिरीक्षण | २६-३० |
| ६. | स्मशाने आणि विद्युत दहन भूमी | ३१-३२ |
| ७. | महानगरपालिका विश्लेषक प्रयोगशाळा | ३३-३४ |
| ८. | धोबीघाट, महालक्ष्मी | ३५ |
| ९. | श्वान नियंत्रण विभाग | ३६-३८ |
| १०. | कोंडवाडा विभाग | ३९-४० |
| ११. | कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन | ४१-४३ |
| १२. | विषमचिकित्सा दवाखाने | ४४-४५ |
| १३. | आयुर्वेदीक आणि युनानी दवाखाने | ४६-४७ |
| १४. | महानगरपालिका लैंगिक संसर्गजन्य रोग चिकित्सालय | ४८-५० |
| १५. | जनगणना | ५१ |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सार्वजनिक आरोग्य खाते

## कार्यानुरुप अहवाल २०२३-२४

## विभाग क्र. १

## सर्वसाधारण (सामान्य) प्रशासन

**१. प्रस्तावना :**

कार्यकारी आरोग्य अधिकारी हे या खात्याचे प्रमुख अधिकारी असून त्यांना १ सह कार्यकारी आरोग्य अधिकारी व ६ उप कार्यकारी आरोग्य अधिकारी व १४ सहाय्यक आरोग्य अधिकारी व किटकनाशक अधिकारी सहाय्य करतात. सार्वजनिक आरोग्य खात्याच्या विविध शाखांच्या कामावर यांच्या मार्फत समन्वय साधून नियंत्रण ठेवण्यात येते. साथीचे रोग प्रतिबंध व उपचार करण्यासाठी विविध शाखांमधील कर्मचारीवृंदाचे सुसूत्रिकरण करण्यात येते. आरोग्य विषयक प्रश्नासंबंधी धोरणात्मक बाबी ठरविणे तसेच त्यांच्या कामकाजासंबंधी योजना आखणे, विविध रोगांवरील नियंत्रणासाठी योजना तयार करणे, नवीन वैद्यकीय संस्था व सहाय्य केंद्राच्या सुविधा आवश्यकतेप्रमाणे कळविणे इत्यादी कामे कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्यामार्फत पार पाडली जातात. सहाय्यक आरोग्य अधिकारी व उप कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या पर्यवेक्षणाखाली कार्यरत असलेले महापालिका विभागातील प्रत्येक वैद्यकीय अधिकारी (आरोग्य), वैद्यकीय अधिकारी / सहा.वैद्यकीय अधिकारी, स्वच्छता निरीक्षक व इतर कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने जीवन विषयक सांख्यिकी माहिती परिरक्षित करणे, जन्म मृत्यूची नोंदणी करणे, जन्म मृत्यू प्रमाणपत्रे नागरिकांच्या मागणीनुसार उपलब्ध करणे, अन्न स्वच्छता व परवाना अटींचे पालन करणे, विवाह नोंदणी करणे, विवाह मंडळांची नोंदणी करणे तसेच सर्व राष्ट्रीय आरोग्य विषयक कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे इत्यादी कामे केली जातात.

कार्यकारी आरोग्य खात्याचा जन्म-मृत्यू नोंदणी अभिलेख जतन केलेला आहे. जवळजवळ १०० वर्षापासूनचा अभिलेख कार्यकारी आरोग्य खात्याकडे उपलब्ध आहे. सदर अभिलेखाचे एकाच ठिकाणी कायमस्वरूपी जतन करण्याकरिता ॲक्वर्थ कुष्ठरोग रुग्णालयाच्या आवारात बांधण्यात येणाऱ्या प्रस्तावित नवीन इमारतीत जागा उपलब्ध करून देण्याचे प्रस्ताविले आहे.

**२. उपक्रमांच्या वर्गवारीनुसार वित्तीय आवश्यकता :**

(₹ हजारात)

| अ. क्र. | उपक्रमांचे तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|
| १. | सामान्य प्रशासन व पर्यवेक्षण | १,००,६९,३७ | ५१,८२,०० | १,०२,५३,३३ |
| २. | जन्म व मृत्यू नोंदणी उता-यांचे वितरण, संकलन व विविध रोगांच्या आकडेवारीचे परिरक्षण | ३४,२६,६७ | १८,८३,८३ | ३६,१०,६३ |
| ३. | अन्न परवाने व इतर जागेचे परवाने यामध्ये मुंबई महानगरपालिका अधिनियम एम.पी.एफ.ए. नियमांतर्गत परवाना अटीची अंमलबजावणी | २,६५,१० | २,५१,१९ | ४,४९,०६ |
| | एकूण | १,३७,६१,१४ | ७३,१७,०२ | १,४३,१३,०२ |

**३. कार्यानुरुप/उपक्रमानुसार कार्यभार गोषवारा :-**(परिमाणाच्या गणनेत)

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | परिमाणाचे गणन | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष आकडे २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|---|
| १. | सामान्य प्रशासन व पर्यवेक्षण | | आस्थापना आणि प्रशासकीय कामे | | |
| २. | अ - जन्म नोंदी | आकड्यांमध्ये | ---- | १०७६८९ | ---- |
| | ब - मृत्यू नोंदी | | ---- | १०६५७९ | ---- |
| ३. | महानगरपालिका अधिनियमाअंतर्गत निरीक्षण केलेली अन्न स्थळे | -''- | एम.पी.एफ.ए. कायदा दि.०५.०८.२०११ पासून संपुष्टात आला. | | एम.पी.एफ.ए.कायदा दिनांक ०५.०८.२०११ पासून संपुष्टात आला. |
| ४. | एम.पी.एफ.ए. कायद्यानुसार निरीक्षण केलेली अन्न स्थळे | -''- | | | |
| ५. | परिरक्षण केलेले अन्न नमुने | -''- | | | |

४.	**कर्मचारीविषयक गोषवारा** (आकडयांमध्ये)

**कर्मचारीविषयक गोषवारा प्रवर्गानुसार आणि उपक्रमानुसार -२०२३-२०२४**

| अनु. क्र. | प्रवर्गानुसार कर्मचारी | कर्मचाऱ्यांची उपक्रमानुसार संख्या उपक्रमाचे संक्षिप्त वर्णन | | | एकूण कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | १. | २. | ३. | |
| १. | प्रशासकीय कर्मचारीवृंद | १११ | ५४ | ३६ | २०१ |
| २. | पर्यवेक्षी आणि दुय्यम | १७० | ९३ | ३८ | ३०१ |
| ३. | श्रमिक, तांत्रिकी व इतर | १२५ | ५६ | ४५ | २२६ |
| | एकूण | ४०६ | २०३ | ११९ | ७२८ |

## <u>विभाग क्र. २</u>

## साथरोग

**१. प्रस्तावना :**

सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत दि.२५.०४.२००७ पासून साथरोग नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सद्यस्थितीत साथरोग नियंत्रण कक्ष हा ३ रा मजला, रुम नं.४८, एफ - दक्षिण इमारत , परेल - १२ येथे कार्यरत आहे. दरवर्षी पावसाळ्याचे आगमन जूनच्या पहिल्या ते दुसऱ्या आठवड्यात होते. पावसामुळे साथींच्या रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता वाढते. उदा. डेंग्यू, लेप्टो, मलेरिया, गॅस्ट्रो, एच-१ एन-१, विषमज्वर, काविळ, चिकनगुनिया, कोरोना विषाणू (COVID-19) इत्यादी. सदर रोगांवर नियंत्रण ठेवण्याकरिता संपूर्ण सोयीने सुसज्ज असे साथरोग नियंत्रण कक्ष व त्यातील कामांचे नियोजन करण्यात आले आहे.

कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वाचे नियोजन करण्यासाठी व निर्णय घेण्यासाठी 'साथरोग समिती' स्थापन करण्यात आलेली आहे. उप कार्यकारी आरोग्य अधिकारी (साथरोग) हे ह्या समितीचे सदस्य सचिव आहेत. सूक्ष्मजीवशास्त्र, प्रतिबंधक व सामाजिक वैद्यकशास्त्र या विभागाचे प्रमुख, मुख्य वैद्यकीय अधीक्षक (उपनगरीय रुग्णालये) व वरिष्ठ वैद्यकीय अधीक्षक, कस्तुरबा रुग्णालय हे या समितीचे सदस्य आहेत.

**साथरोग समितीची कामे पुढीलप्रमाणे आहेत.**

१. एकत्रितपणे एकाच ठिकाणी येऊन आणि एकमेकांच्या समन्वयाने मुंबईमध्ये सर्वेक्षण कामकाज राबविण्याकरिता तीन शैक्षणिक रुग्णालये, कस्तुरबा रुग्णालय, प्रमुख वैद्यकीय अधीक्षक (उपनगरीय रुग्णालये) यांचे कार्यालय येथे उपग्रह रोग सर्वेक्षण केंद्रांची स्थापना करण्यात आलेली असून त्यांचा साथरोग कक्षाशी समन्वय आहे.

२. सदर साथरोग समिती उपचारपध्दती अंमलात आणण्यासाठी रोगांची व्याख्या करणे, त्या रोगांचा अभ्यास करणे, त्यांच्यावर इलाज करणे, विश्लेषण करणे, गरज भासल्यास नियम तयार करणे आणि अहवालांचे नमुने ठरविणे ही मुख्य कामे करते व विशेषत: पावसाळ्यामध्ये व पावसाळ्यानंतरच्या काळात ही समिती विशेष लक्ष केंद्रित करते.

सहाय्यक आरोग्य अधिकारी (साथरोग) हे संपूर्ण साथरोग कक्षाचे मुख्य असून या कक्षाची सर्व कामे सुरळीत चालण्यासाठी पर्यवेक्षकीय कामकाज पहात आहेत.

गॅस्ट्रो एंन्ट्राइटीस, टायफॉईड, इन्फेक्टीव हेपॅटायटीस, लेप्टोस्पायरोसिस, डेंग्यू, चिकनगुनिया, कोरोना विषाणू (COVID-19) सारख्या एखाद्या संसर्गजन्य आजाराचा उद्रेक झाल्याचे कळताच साथरोग कक्षाद्वारे अशा परिस्थितीचे नियंत्रण करण्याकरिता योग्य कारवाई करण्याबाबत समन्वय ठेवण्यात येतो आणि विभागातील संबंधित कर्मचाऱ्यांना अशा परिस्थितीमध्ये मदत करण्याची प्रमुख भूमिका बजावण्यास सांगितले जाते.

**साथरोग कक्षाची प्रमुख कामे :**

१) स्थानिक आरोग्य अधिकाऱ्यांना साथीच्या रोगाच्या उद्रेकाची माहिती कळवून त्वरित प्रतिसाद देणे व त्यांना साथीच्या रोगाचे नियंत्रण करण्यास मदत करणे.

२) आलेल्या सर्व अहवालांचे पृथक्करण करणे व करावयाच्या कार्यवाहीचे नियोजन करणे.

३) सध्याच्या स्थितीनुसार लेप्टो व डेंग्यूच्या रुग्णांची क्रमवार यादी तयार करणे व ती अद्ययावत ठेवणे.

४) नोंद घेण्यासारख्या साथरोगांची माहिती एकत्रित करणे व सदर रोगांच्या माहितीची त्वरित देवाणघेवाण करण्याकरिता संपर्क प्रणाली उभारणे.

५) आरोग्य खात्याच्या सर्व विभागांना साथरोगांचे निदान, व्यवस्थापन आणि अहवाल प्रदान करण्याकरिता वेळोवेळी मार्गदर्शिका तयार करणे व त्याचे वितरण करणे.

६) शासकीय अधिकाऱ्यांशी समन्वय व संपर्क ठेवणे व त्यांना वेळोवेळी अहवाल सादर करणे.

७) विविध रोगांच्या नियंत्रणाच्या उपाययोजना करण्यासाठी महापालिका प्रयोगशाळा व कीटक नियंत्रण अधिकारी यांच्याशी सतत समन्वय ठेवणे.

८) प्राप्त झालेल्या रोगांच्या रुग्णांचे रक्तनमुने आवश्यक तेथे विविध संदर्भ प्रयोगशाळांकडे पाठविणे व योग्य तपास करुन एखाद्या रोगाचा उद्रेक असल्याची खात्री करणे.

९) सार्वजनिक आरोग्य खात्याच्या कीटक नियंत्रण शाखेस साथरोगांच्या रोगांची माहिती कळवून मुलभूत डास प्रतिबंधात्मक कार्यवाहीच्या सेवा मजबूत करणे.

१०) खाजगी क्षेत्रात व मुंबई महानगरपालिकेत कार्यरत असणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना साथरोग नियंत्रणाबाबत प्रशिक्षण देणे व त्यांची कार्यक्षमता वाढविणे.

११) संसर्गजन्य रोगाविषयी जनजागृती करण्यासाठी माहिती शिक्षण व संपर्काचे साहित्य तयार करण्याकरिता माहिती शिक्षण व संपर्क कक्षास महत्त्वाची माहिती पुरविणे.

१२) साथरोगाच्या उद्रेकाचा प्रतिबंध आणि नियंत्रण करण्यासाठी समाजाचा सहभाग वाढविणे.

**साथरोगाच्या उद्रेकाच्या वेळी करण्यात येणारी कार्यवाही** :

विषमज्वर, कावीळ, डेंग्यू, ताप, अतिसार, उलट्या व जुलाब यासारख्या एखाद्या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव जेव्हा एखाद्या विभागात होतो तेव्हा चलत उपचार केंद्रांचे पथक त्या विभागास भेट देऊन स्थानिक आरोग्य केंद्र कर्मचाऱ्यांबरोबर घराघरातील रुग्णांची पाहणी करतात व त्यांच्यावर तात्काळ औषधोपचार करतात. तसेच या विभागात इतरत्र तशाच प्रकारचे

आणखी रुग्ण आहेत किंवा नाही याची माहिती गोळा करतात. साथीच्या रोगाचा एखादा रुग्ण आढळल्यास त्यावर तात्काळ औषधोपचार करुन त्या साथीच्या रोगाचा प्रसार वाढू नये म्हणून रुग्ण व त्याच्या नातेवाईकांना व आजूबाजूच्या परिसरातील लोकांना रुग्णांची देखभाल व रोगप्रतिबंधक उपाययोजना कशी करावी याबाबत लोकशिक्षण देतात. एखाद्या साथीच्या रुग्णास रुग्णालयात दाखल करावयाचे असल्यास त्याप्रमाणे त्यांना सल्ला देण्यात येतो. समाज विकास अधिकारी व आरोग्य प्रशिक्षक हे त्या विभागात वैयक्तिक स्वच्छता, परिसर स्वच्छता व रोग प्रतिबंधक उपाययोजना व साथीच्या रुग्णांची घ्यावयाची काळजी व त्यांची औषध उपचार योजना यासंबंधीचे आरोग्य शिक्षण देतात.

साथीच्या रोगाची माहिती दर आठवड्यास अहवाल प्राप्त करुन त्याचे विश्लेषण आयडीएसपीच्या राष्ट्रीय संकेतस्थळावर अपलोड करण्यात येते.

**नियंत्रण कक्ष :**

साथरोग नियंत्रण विभाग हे कस्तुरबा रुग्णालय येथे उभारण्यात आले असून साथरोग नियंत्रण कक्षाच्या कामाकरिता सहाय्यक आरोग्य अधिकारी, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी तसेच २ संगणक चालक या कक्षामध्ये कार्यरत असतात. पावसाळ्यात उद्भवणाऱ्या साथीच्या रोगांबाबत महानगरपालिका, शासकीय व खाजगी रुग्णालयांकडून तसेच दवाखाने व आरोग्य केंद्रांचे पावसाळ्यातील कामांबाबत विभागाद्वारे पाठविण्यात येणारा अहवाल प्राप्त करुन सहाय्यक आरोग्य अधिकारी यांच्या देखरेखीखाली त्याचा संकलीत अहवाल दररोज तयार करण्यात येतो व तो महानगरपालिका आयुक्त, कार्यकारी आरोग्य अधिकारी, जनसंपर्क अधिकारी तसेच शासकीय अधिकारी यांना विहित वेळेत नियमितपणे फॅक्सद्वारे तसेच सर्व अहवाल ई-मेलद्वारे देखील सादर करण्यात येतात अथवा कळविण्यात येतात.

**चलत उपचार केंद्र :**

चलत उपचार केंद्र हे सहाय्यक आरोग्य अधिकारी (साथरोग) यांच्या अधिपत्याखाली कार्यरत आहे व साथरोग कक्षाशी संलग्न आहे. त्यामध्ये वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, समाज विकास अधिकारी, श्रमिक कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. त्यांच्या पथकासाठी महानगरपालिकेची दोन वाहने देण्यात आलेली आहेत.

१. वैद्यकीय आरोग्य अधिकारी किंवा आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यास एखाद्या साथीच्या रोगाच्या उद्रेकाच्या वेळी मदत करणे तसेच वेळोवेळी विविध संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव दर्शविण्याकरिता सर्वेक्षण करण्याचे काम चलत उपचार केंद्राद्वारे केले जाते.

२. पावसाळ्यात उद्‌भवणाऱ्या साथीच्या रोगांच्या प्रतिबंधासाठी सदर विभागामार्फत मान्सूनपूर्व औषधे खरेदी करण्यात येतात व त्या औषधांचे वाटप पूर्व उपनगरे, पश्चिम उपनगरे व शहरे (ब्युरो कार्यालये) यांच्यामार्फत महापालिकेच्या आरोग्य केंद्रांना केले जाते.

**चाचण्या**

कोविड आजाराशी संबंधित चाचण्या (RT-PCR / Rapid Antigen Test) करण्यासाठी केंद्र शासनाने महापालिका / राज्य शासन / खाजगी प्रयोगशाळांना मान्यता प्रदान केली आहे. मुंबईत लक्षणे असलेल्या व अति जोखीम असलेल्या जास्तीत जास्त व्यक्तींना शोधून कोरोनाचे निदान करून सदर रोगाच्या प्रसारावर आळा घालण्यास व प्रार्दुभाव कमी करण्यास महापालिका सतत प्रयत्नशील आहे. कोविड चाचणी संदर्भात - अखिल भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान संस्थेने दिलेल्या व वेळोवेळी अद्ययावत केलेल्या निकषानुसार मुंबईत कोविड संबधी चाचणी पार पाडल्या जातात. या निकषानुसार कोविडची लक्षणे असलेले रुग्ण, कोरोना बाधित रुग्णांचे अति जोखमीचे सहवासीत, ज्यांची ऑक्सिजन पातळी कमी आहे असे वृद्ध, दीर्घकालीन आजार असलेल्या व्यक्ती या सर्वांच्या चाचण्या केल्या जातात.

**लसीकरण**

अंथरुणाला खिळलेल्या नागरिकांसाठी कोविड लसीकरण करण्यासाठी प्रणाली अंमलात आणणारे मुंबई हे भारतातील पहिले शहर ठरले आहे. नोव्हेंबर २०२२ मध्ये, मुंबईत नुकत्याच झालेल्या गोवरच्या उद्रेकादरम्यान, ताप आणि पुरळ असलेल्या रुग्णांचा शोध घेण्यासाठी घरोघरी सर्वेक्षण करण्यात आले. सर्व संशयित रुग्णांना २४ तासांच्या अंतराने ‘व्हिटॅमिन ए’ चे दोन डोस देण्यात आले. तसेच, प्रादुर्भावग्रस्त भागात, उद्रेक प्रतिसाद लसीकरण (Outbreak Response Immunisation) केले जात आहे आणि शहरभर अतिरिक्त लसीकरण शिबिरांच्या माध्यमातून लसीकरण न झालेल्या मुलांचे लसीकरण करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत.

**गोवर या आजाराबाबत प्रतिबंध व नियंत्रणासाठी करावयाच्या उपाययोजना.**

- आरोग्य कर्मचा-यांमार्फत घरोघरी जाऊन गोवर संशयित रुग्णांचे सर्वेक्षण करण्यात येत असून संशयित रुग्णांना जीवनसत्व ‘अ‘ देण्यात येत आहे.
- आवश्यकता भासल्यास संशयित रुग्णांना जवळच्या महानगरपालिका रुग्णालयात उपचारासाठी संदर्भित करण्यात येत आहे.
- ९ महिने व १६ महिन्यांच्या बालकांसाठी लसीकरणाचे अतिरिक्त सत्रे आयोजित करण्यात येत असून वैद्यकीय अधिका-यांमार्फत बालकांची तपासणी करण्यात येत आहे.

➢ खाजगी डॉक्टरांना व प्रभावशाली व्यक्तींना गोवर आजार तसेच लसीकरणाबाबत अवगत करण्यात आलेले आहे.

➢ केंद्रीय पथकाने राज्यशासनाच्या प्रमुख सचिवांना तसेच अतिरिक्त आयुक्त (प.उप.) यांनी दिलेल्या सुचनेनुसार मुंबईतील गोवर उद्रेकाच्या सद्यपरिस्थितीबाबत खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे.

१. उद्रेक असलेल्या विभागात सर्वेक्षणाद्वारे दररोज ताप व पुरळा असलेल्या नविन रुग्णांचा शोध घेणे.

२. लक्षण आढळलेल्या रुग्णांचा दुस-या दिवशी पाठपुरावा करणे.

३. अतिरिक्त लसीकरण सत्राचे आयोजन करणे.

४. रुग्ण दाखल करण्याची सुविधा वाढविणे.

५. आरोग्य सेविकांना गोवर आजाराच्या गंभीर लक्षणांबाबत अवगत करणे.

६. खाजगी डॉक्टरांना गोवर आजार व लसीकरणाविषयी अवगत करणे.

७. लसीकरणाबाबत व्यापक प्रमाणात जनजागृती करणे.

## २. उपक्रमाच्या वर्गवारीनुसार वित्तीय आवश्यकता

(₹ हजारात)

| अ. क्र. | उपक्रमांचे तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|
| १. | साथीच्या रोगांच्या उद्रेकामध्ये मोठया प्रमाणावर प्रतिबंधक लस टोचणे व लसीकरण करणे तसेच औषधांचे वितरण करणे. कोरोना व्हायरस नियंत्रित करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना | १,२३,१३,१३ | २,५५,५४,६५ | १,२५,४६,४४ |
| | एकूण | १,२३,१३,१३ | २,५५,५४,६५ | १,२५,४६,४४ |

३.	**कार्यानुरुप/उपक्रमानुसार कार्यभार गोषवारा (परिमाणाच्या गणनेत)**

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | परिमाणाचे गणन | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष आकडे २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|---|
| | **सर्वेक्षण** | | | | |
| १. | घरांना दिलेल्या भेटी | आकडया मध्ये | (पूर्व संकल्पित लक्ष्य ठरलेले नसते) | ३०१४२७ | (पूर्व संकल्पित लक्ष्य ठरलेले नसते) |
| २. | संपर्क साधलेली लोकसंख्या | -”- | -”- | ९४१७९३ | -”- |
| ३. | **रोगबाधा झालेल्या रुग्णाची संख्या** | | | | |
| | ताप | -”- | -”- | --- | -”- |
| | यु.आर.आय.टी. | -”- | -”- | --- | -”- |
| | अतिसार | -”- | -”- | --- | -”- |
| | काविळ | -”- | -”- | --- | -”- |
| | इतर | -”- | -”- | --- | -”- |
| ४. | वैद्यकीय शिबिरे | -”- | -”- | ४९५ | -”- |
| ५. | आयोजित केलेली एकूण वैद्यकीय शिबिरे | -”- | -”- | ४९५ | -”- |
| ६. | ओ.आर.एस.पाकिटांचे वितरण | -”- | -”- | ३०००० | -”- |
| ७. | क्लोरीन गोळया वाटप | -”- | -”- | --- | -”- |
| ८. | आय.ई.सी. पोस्टर्स वितरण | -”- | -”- | २००००० | -”- |
| ९. | आय.पी.सी. (इंटरपर्सनल कम्युनिकेशन) | -”- | -”- | १६८७ | -”- |
| १०. | आरोग्य अभियान शिबिरे | -”- | -”- | --- | -”- |
| ११. | लाभार्थी | -”- | -”- | --- | -”- |

४.	**कर्मचारी विषयक गोषवारा (आकडयामध्ये)**

**कर्मचारी विषयक गोषवारा प्रवर्गानुसार आणि उपक्रमांनुसार – २०२३-२४**

| अ. क्र. | प्रवर्गानुसार कर्मचारी | कर्मचाऱ्यांच्या उपक्रमानुसार संख्या / उपक्रमाचे संक्षिप्त वर्णन | | | एकूण कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रशासकीय कर्मचारीवृंद | पर्यवेक्षी आणि दुय्यम | श्रमिक, तांत्रिकी व इतर | |
| १. | सहाय्यक आरोग्य अधिकारी (ईपीआय) | १ | -- | -- | १ |
| २. | वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी (आरोग्य) | ३ | -- | -- | ३ |
| ३. | विशेष कर्तव्य अधिकारी | ० | -- | -- | ० |
| ४. | वैद्यकीय अधिकारी | १ | -- | -- | १ |
| ५. | सहा.वैद्यकीय अधिकारी | ५१ | १७ | ८ | ७६ |
| ६. | रोगाणूनाशक दुय्यम निरिक्षक | १० | ९ | ६ | २५ |
| ७. | मुख्य लिपिक | १ | -- | -- | १ |
| ८. | वरिष्ठ स्वच्छता निरिक्षक | २ | १ | -- | ३ |
| ९. | अन्ननिरिक्षक | १५ | ३ | ३ | २१ |
| १०. | स्वच्छता निरीक्षक (अन्न) | २ | १ | १ | ४ |
| ११. | वरिष्ठ अन्न निरिक्षक | २ | -- | १ | ३ |
| १२. | लस टोचक (सहाय्यक वैद्यकीय अधिकारी) | -- | -- | २ | २ |
| १३. | लिपिक नि टंकलेखक | २ | -- | -- | २ |
| १४. | कनिष्ठ अवेक्षक | ९ | ६ | ६ | २१ |
| १५. | समाज विकास अधिकारी | २ | -- | -- | २ |
| १६. | लिपिक | २५ | -- | -- | २५ |
| १७. | प्रक्षेपक चालक | १ | -- | -- | १ |
| १८. | संख्यातज्ज्ञ (सांख्यिकी तज्ज्ञ) | १ | -- | -- | १ |
| १९. | नोंदणी सहाय्यक | ४ | -- | -- | ४ |
| २०. | साहयकारी परिचारिका | ४ | १० | ४ | १८ |
| २१. | स्वच्छता निरीक्षक | -- | -- | १ | १ |
| | **एकूण** | १३६ | ४७ | ३२ | २१५ |

## विभाग क्र. ३

## विस्तारीत लसटोचणी कार्यक्रम (विलका)

**१. प्रस्तावना :**

विस्तारित लसटोचणी कार्यक्रमाची सुरुवात १९७८ साली झाली. ज्यामध्ये पाच वर्षाखालील सर्व बालके अंतर्भुत होती आणि दिनांक ०१.०६.१९८५ साली राष्ट्रीय (जागतिक) लसटोचणी कार्यक्रमाची (Universal Immunization Programme – UIP) सुरुवात झाली, ज्या अंर्तगत पाच वयाच्या आतील मुलांचे लसींद्वारे टाळता येणा-या पोलिओ, क्षयरोग, घटसर्प, डांग्या खोकला, धर्नुवात, कावीळ, पोलिओ, गोवर, रूबेला, रोटा वायरस, अतिसार व एच एनफ्लूनझा – बी या रोगांपासून रक्षण करण्यासाठी त्यांना प्रतिबंधक लसी दिल्या जातात. तसेच वय वर्ष १० व १६ वर्ष वयाच्या मुलांना त्याचप्रमाणे विस्तारित लसीकरण कार्यक्रमांतर्गत गर्भवती स्त्रियांना धनुर्वात व घटसर्प टाळण्यासाठी (त्र) लसीकरण केले जाते. तसेच महानगरपालिकेचे सर्व दवाखाने , आरोग्य केंद्रे, प्रसुतीगृहे आणि उपनगरीय रुग्णालये येथे मोफत लसीकरण केले जाते.

**विलका विभागातर्फे खालील कर्तव्ये पार पाडली जातात :-**

१. शीतसाखळी सापेक्ष लस साठवून ठेवणे व वाटप करणे. तसेच शितसाखळीचे आधुनिकीकरणासाठी eVIN ही प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली आहे. ज्यामुळे लसीची गुणवत्ता अबाधित राहण्यासाठी सोपे झाले.

२. लसीकरण अहवाल गोळा करुन एकत्रिकरण करणे.

३. लसीकरणाच्या स्थितीविषयीचे मूल्यमापन करणे.

४. लसीकरणानंतर होणा-या वेगवेगळया विपरीत प्रतिक्रिया अथवा मृत्यु याबाबत जिल्हास्तरीय तज्ज्ञ अधिका-यांच्या अध्यक्षतेखाली समिती कार्यान्वित असून प्रत्येक घटनेची चौकशी करण्यात येते.

५. मिशन इंद्रधनुष्य, पल्स पोलिओ लसीकरण व गोवर – रूबेला मोहीम असे विशेष लसीकरण कार्यक्रम आयोजित करणे.

६. सेवाभावी संस्थांची रुग्णालये, खाजगी प्रसुतीगृहे, निम सरकारी संस्था तसेच खाजगी दवाखाने यांना लसपुरवठा करणे व त्यांच्या लसीकरण कार्यक्रमाचे पर्यवेक्षण करणे.

७. अकस्मात लुळेपण आलेल्या रुग्णांचे सर्वेक्षण आणि त्यांच्या प्रसारावर नियंत्रण आणणे.

८. गोवर - रूबेला रोगाचे सर्वेक्षण करणे.

९. बालकांमधील लसीकरण प्रतिबंधक रोग व त्यामुळे होणारे मृत्यू यांचे सर्वेक्षण करणे.

**पोलिओ निर्मुलन कार्यक्रम :-**

जागतिक आरोग्य संघटनेने २००५ पर्यंत पोलिओ निर्मूलन करण्याचे निश्चित केल्यापासून १५ वर्षे वयाखालील अकस्मात लुळा लकवा झालेला प्रत्येक रुग्ण संशयित पोलिओ रुग्ण समजला जातो म्हणून त्याची माहिती जवळील आरोग्य अधिका-यास कळविणे अत्यावश्यक आहे. असा रुग्ण नोंदवला जाताच सार्वजनिक आरोग्य खात्याचे कर्मचारी त्या रुग्णाचा चौकशी अहवाल, परिक्षण अहवाल भरुन ताबडतोब त्या रुग्णाच्या घराच्या अवतीभोवतीच्या ५०० घरांमधील ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना घरोघरी जाऊन पोलिओचा जादा डोस पाजतात. त्याला 'साखळी लसीकरण' किंवा 'रोग प्रादुर्भावाविरुद्ध लसीकरण' असे म्हणतात. नोंदणी झालेल्या 'अकस्मात लकवा' झालेल्या रुग्णाचे दोन 'मल नमुने' शीतसाखळी सापेक्ष ERC प्रयोगशाळेत पुढील तपासणीसाठी पाठविण्यात येतात. जर बालकाच्या मल नमुन्यात पोलिओचे जंगली विषाणु सापडल्यास त्यास 'पोलिओ रुग्ण' म्हटले जाते.

'पोलिओ मुक्त विश्व' चे जागतिक आरोग्य संघटनेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी १९९५-९६ या सालापासून दर वर्षी पल्स पोलिओ कार्यक्रमाची सुरुवात झाली.

**पल्स पोलिओ आणि अतिदक्ष पल्स पोलिओ :-**

पल्स पोलिओ लसीकरण म्हणजे ५ वर्षे वयाखालील सर्व बालकांना एकाच दिवसात नियमित लसीकरणाव्यतिरिक्त 'पोलिओचा अतिरिक्त' डोस पाजणे. विशिष्ट महिन्यातील रविवारचा एक दिवस हा पल्स पोलिओचा दिवस म्हणून पाळला जातो. या दिवशी बूथवर पाच वर्षाखालील सर्व मुलांना पोलिओचे दोन थेंब पाजतात.

पल्स पोलिओच्या दिवशी ज्या बाळांना डोस पाजायचा राहून गेला असेल त्यांच्या घरोघरी जाऊन पुढचे ५ दिवस प्रत्येकी २ स्वयंसेवकांच्या लसीकरण चमुतर्फे योजनाबध्द रितीने पोलिओ डोस पाजले जातात. या मार्गाने परिसरातील जंगली विषाणूच्या जागी लसीतील पाळीव विषाणूची स्थापना होऊन परिसर पोलिओमुक्त होणे शक्य होते कारण अशी डोस प्यायलेली बालके एकाच वेळेस लस-विषाणू मलाद्वारे उत्सर्जित करतात.

**विस्तारीत लसीकरण कार्यक्रमाअंतर्गत नविन लसीचा समावेश :**

१. **एम.एम.आर. लसीकरण** : गोवर, गालगुंड आणि जर्मन गोवर (एम.एम.आर.) या रोगापासून संरक्षण करणा-या एम.एम.आर. हया मोफत लसीकरण कार्यक्रमाची सुरुवात स्थायी समिती ठराव क्र. एससीआर/१५९, दि. २४.०५.२००६ अन्वये सन २००६-०७ पासून आहे. या लसीचा एक डोस १५ महिने पूर्ण झालेल्या बालकांना देण्यात येतो. एम.एम.आर. ही लस बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निधीतून आरोग्य विभागातर्फे खरेदी केल्या जातात व लाभार्थींना मोफत दिल्या जातात.

२. **पेंटाव्हॅलंट (पंचगुणी) लसीकरण** : दि. २२.११.२०१५ पासून पेंटाव्हॅलंट लसीचा समावेश नियमित लसीकरण कार्यक्रमात करण्यात आला. बालकांना पेंटाव्हॅलंट लस दिल्याने घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात, हिपॅटायटिस-बी,

हिमोफिलस इन्फल्यूएंझी टाईप बी या आजारांपासून संरक्षण मिळते. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील १ १/२ महिना व १ वर्षे वयोगटातील बालकांना नियमित लसीकरण कार्यक्रमाअंतर्गत ही लस देण्यात येते. पेंटाव्हॅलंट लस बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महापालिका आरोग्य केंद्र, दवाखाने व रुग्णालये इ. ठिकाणी नियमित लसीकरण कार्यक्रमाअंतर्गत मोफत देण्यात येते.

३. **आयपीव्ही लसीकरण** : दि. २५.०४.२०१६ पासून आयपीव्ही (इंजेक्टेबल पोलिओ) लसीचा समावेश नियमित लसीकरण कार्यक्रमामध्ये करण्यात आला आहे. या लसीचे दोन डोस अनुक्रमे १ १/२ महिना व ९ महिना या वयातील बालकांना देण्यात येतात.

४. **स्वाईन फ्ल्यू लसीकरण** : स्वाईन फल्यू (एच १ एन १) लस सन २०१० पासून आरोग्य संस्थांमध्ये काम करणा-या कर्मचा-यांना मोफत देण्यात येते. तसेच ऑगस्ट २०१५ पासून दुस-या व तिस-या तिमाहीतील गरोदर मातांना विहित लसीकरण केंद्रांवर मोफत लस देण्यात येते. हे लसीकरण ऐच्छिक आहे.

५. **रोटा लसीकरण** : रोटा व्हायरस लस ही सन २०१९ च्या नियमित लसीकरण कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आलेली आहे, ज्यामुळे हगवणीमुळे होणारे बालमृत्युचे प्रमाण कमी होईल.

६. **न्युमोकॉकल कॉन्जुगेअेड लसीकरण (PVC)** - न्युमोकॉकल कॉन्जुगेअेड लस ही २०२१ पासून नियमित लसीकरण कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आलेली आहे. ज्यामुळे २ वर्षाखालील न्युमोनिया या आजारामूळे होणारे बालमृत्यूचे प्रमाण कमी होईल.

**विशेष लसीकरण - रेबिज प्रतिबंधक लस :**

लुईस पाश्चर हया शास्त्रज्ञाने प्रथम रेबिज या रोगावर लस शोधून काढली. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त २८ सप्टेंबर हा दिवस “जागतिक रेबिज प्रतिबंधक दिवस” म्हणून साजरा केला जातो. रेबिज रोगाबद्दल जनजागृती निर्माण करणे तसेच या रोगाच्या प्रतिबंधासाठी व निर्मूलनासाठीच्या उपाययोजनांमध्ये उत्तरोत्तर सुधारणा करण्यासाठी या वर्षी “शिक्षित करा, लसीकरण करा, निर्मूलन करा” हे घोषवाक्य ठरविण्यात आले आहे. रेबिज हा विषाणूमुळे मज्जासंस्थेला होणारा प्राणघातक रोग आहे. हा पशुजन्य आजार प्रथम कुत्रा, मांजर, कोल्हा, लांडगा, वटवाघूळ यांना होतो. अशा रेबिज रोग झालेल्या प्राण्यांच्या चावण्याने किंवा चाटण्यामुळे हा रोग मनुष्यामध्ये संक्रमित होतो. कुत्र्यापासून ‘रेबीज’ चा धोका असल्यामुळे कुत्र्यांची माणसाला भिती वाटते. त्यामुळे जागतिक रेबीजदिनी मुंबई महापालिकेने रेबीज लसीकरण मोहीम राबवून भटक्या कुत्र्यांना रेबीजचे इंजेक्शन देण्यात आले.

**कोविड - १९ लसीकरण :**

कोविड - १९ लसीकरण कार्यक्रम दि.१६ जानेवारी, २०२१ पासून बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोविड -१९ रोगांविरुध्द प्रतिकारशक्ती निर्माण करण्यासाठी सुरु करण्यात आला आहे. सुरुवातीला प्राधन्य क्रम जसे की, आरोग्य कर्मचारी, आघाडीचे कर्मचारी आणि नंतर १८ वर्षे आणि त्यावरील सर्व नागरिक, मुले १५-१७ वर्षे आणि १२-१४ वर्षे (यांचे लसीकरण सुरु झाले. दि.२०.१०.२०२३ पर्यंत १,०८,९४,१६८ लाभार्थ्यांना पहिला डोस,९८,१५,५२३ लाभार्थ्यांना दुसरा डोस आणि १४,९०,२३४ लाभार्थ्यांना प्रिकॉशन डोस देण्यात आला आहे. मुंबई हे भारतातील पहिले शहर आहे जिथे अंथरुणाला खिळलेले लाभार्थी यांचे लसीकरण, प्रभाग कोविड लसीकरण केंद्राद्वारे घराजवळ लसीकरण सुविधा, LGBT (लेस्बियन, गे, बायसेक्शुअल आणि ट्रान्सजेंडरसाठी स्वतंत्र (लसीकरणकेंद्र, सेक्स वर्कर्स, रस्त्यावर विक्रेते, टॅक्सी चालक, महिला, महाविद्यालयीन विद्यार्थी, द्वितीय डोस लाभार्थी, मोबाईल लसीकरण सत्र अशी विशेष सत्रे सुरु करण्याल आली आहेत.

यासाठी महानगरपालिका व शासकीय रुग्णालयात ८२, खाजगी रुग्णालयात १२५ अशी एकूण २०७ कोविड - १९ लसीकरण केंद्र कार्यान्वित आहेत. केंद्र व राज्य शासनाकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस आतापर्यंत १ कोटी, ५१लाख, ११ हजार, १३० एवढ्या लसींच्या मात्रा प्राप्त झालेल्या असून १ कोटी, ०८ लाख, ८८ हजार, ९४४ या लाभार्थ्यांना पहिली मात्रा व ९८ लाख ०७ हजार, ३६६ एवढ्या लाभार्थ्यांना दुसरी मात्रा देण्यात आली आहे.

**विस्तारीत लसीकरण कार्यक्रमाअंतर्गत गाठलेली उद्दिष्टे :**

१. फेब्रुवारी २००८ नंतर पोलिओचा एकही रुग्ण मुंबई शहारात आढळून आलेला नाही. जागतिक आरोग्य संघटनेने २७ मार्च २०१४ रोजी भारताला 'पोलिओ मुक्त देश' घोषित केले आहे.
२. भारत देशात गर्भवती मातांना धनुर्वाताची लस नियमित दिल्याने माता आणि नवजात बालकांना धनुर्वात होण्याचे प्रमाण नगण्य झाले आहे म्हणून जागतिक आरोग्य संघटनेने दि. १४ जुलै २०१६ ला माता व नवजात बालकांना होणारा धनुर्वात हा रोग भारत देशातून लोप पावला आहे असे घोषित केले आहे.
३. पूर्ण लसीकरण झालेल्या बालकांच्या संख्येत वाढ झाली आहे.
४. नियमित लसीकरण कार्यक्रम परिणामकारकरित्या राबविल्यामुळे बालकांना होणा-या लसीकरण प्रतिबंधक रोग व मृत्युच्या संख्येमध्ये लक्षणीय घट झाली आहे.
५. भारत सरकारच्या निर्देशानुसार गोवर आणि रुबेला या आजाराचे डिसेंबर २०२३ च्या अखेरीस निर्मूलन केले जाईल. सन २०२२-२३ मध्ये गोवर रुबेला लसीच्या पहिल्या डोससाठी ८३.६०टक्के आणि दुस-या डोससाठी ८३.७५ टक्के लसीकरण पूर्तता करण्यात आली आहे.

**२०२२-२३ साली झालेल्या नियमित लसीकरणाचा अहवाल पुढीलप्रमाणे आहे.**

| अनु. क्र. | लसीकरण | लाभार्थी | एप्रिल २०२३ ते सप्टेबर २०२३ या कालावधीतील सध्याचे लाभार्थी |
|---|---|---|---|
| १. | पेंटाव्हॅलंट-३ | १,६५,०१८ | ६३,९८३ |
| २. | ओ.पी.व्ही.-३ | १,६५,०१८ | ६३,९६१ |
| ३. | बी.सी.जी. | १,६५,०१८ | ६४,९४३ |
| ४. | एम.आर. | १,६५,०१८ | ७०,३४० |
| ५. | हिपॅटायसीस-बी जन्म डोस | १,६५,०१८ | ५७,२७१ |
| ६. | डी.पी.टी. (बुस्टर) -१ | १,६३,२०३ | ७०,३०८ |
| ७. | ओ.पी.व्ही. (बुस्टर)- १ | १,६३,२०३ | ७०,४४७ |
| ८. | डि.पी.टी. (बुस्टर)- २ | २,१८,६८० | ६२,८७२ |
| ९. | टी.टी.-(१० वर्ष) | २,,२८,२८५ | ५७,३७६ |
| १०. | टी.टी.-(१६ वर्ष) | २,४६,९३३ | ४६,३७७ |
| ११. | टी.टी.-(गरोदर माता) | १,८१,२५० | ८०,५२९ |
| १२. | रोटा - ३ | १,६५,०१८ | ६३,७६२ |
| १३. | पी.सी.व्ही.(बुस्टर) | १,६५,०१८ | ६८,४१२ |
| १४. | एम.एम.आर. | १,६३,२०३ | ६७,६१४ |
| १५. | आय.पी.व्ही. - ३ | १,६५,०१८ | ६६,५०८ |

## २. उपक्रमांच्या वर्गवारीनुसार वित्तीय आवश्यकता

(₹ हजारात)

| अ. क्र. | उपक्रमांचे तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|
| १. | सर्वसाधारण पर्यवेक्षण आणि आस्थापना | ७,६०,७६ | ४,३८,८३ | ७,६५,४३ |
| २. | विस्तारीत लसीकरण कार्यक्रम | ४,३७,३५ | १,८५,९० | ४,४२,०२ |
| | एकूण | ११,९८,११ | ६,२४,७३ | १२,०७,४५ |

३.	कार्यानुरुप/उपक्रमानुसार कार्यभार गोषवारा (परिमाणाच्या गणनेत)

| अ. क्र. | उपक्रमांचे तपशील | परिमाणाचे गणन | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष आकडे २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|---|
| अ) | सर्वसाधारण पर्यवेक्षण आणि आस्थापना | | प्रशासकीय आणि आस्थापना कामे | | |
| | लस वाटप :- | | | | |
| १. | टी.टी. | मात्रा | दि.०१.१०.२०१८ पासून बंद करण्यात आले आहे. | | |
| २. | पेंटाव्हॅलंट | –‘‘- | ४१०००० | ३३९१०० | ४१०००० |
| ३. | टी.डी | –‘‘- | ३२०००० | २५९५३० | ३२०००० |
| ४. | मिझल | –‘‘- | सदर लस दिनांक २७.११.२०१८ पासून बंद करण्यात आली आहे. | --- | सदर लस दिनांक २७.११.२०१८ पासून बंद करण्यात आली आहे. |
| ५. | अे.आर.व्ही.(पेशीयुक्त) | डोस | २००००० | ११२४३० | २००००० |
| ६. | बी.सी.जी. | मात्रा | ३००००० | २३४००० | ३००००० |
| ७. | कावीळ - बी | –‘‘- | २००००० | ७६३७० | २००००० |
| ८. | एम.एम.आर. | –‘‘- | २००००० | १५२०८० | २००००० |
| ९. | पल्स पोलिओ | | | | |
| | ट्राय व्हॅलेंट topv | –‘‘- | निरंक | निरंक | निरंक |
| | बायोपोलिओ bopv | –‘‘- | ४०००००० | २७३२८८० | ४०००००० |
| १०. | आयपीव्ही लस | –‘‘- | ४००००० | २१८५५० | ४००००० |
| ११. | डी.पी.टी. | –‘‘- | ४००००० | २०९८५० | ४००००० |
| १२. | एम.आर. | –‘‘- | १००००० | ३९७१३५ | ४५०००० |
| १३. | रोटा | –‘‘- | ४००००० | ३२२६०० | ४००००० |
| १४. | कोव्हॅक्सिन | –‘‘- | --- | १८१४६० | --- |
| १५. | कोविशिल्ड | –‘‘- | --- | ६४०९४० | --- |
| १६. | पी.सी.व्ही. | –‘‘- | --- | २८७७६५ | ३५०००० |

**४. कर्मचारी विषयक गोषवारा (आकडयांमध्ये)**

**कर्मचारीविषयक गोषवारा प्रवर्गानुसार आणि उपक्रमानुसार गोषवारा २०२३-२०२४**

| अ. क्र. | प्रवर्गानुसार कर्मचारी | कर्मचाऱ्यांच्या उपक्रमानुसार संख्या उपक्रमाचे संक्षिप्त वर्णन | | | | एकूण कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रशासकीय कर्मचारीवृंद | पर्यवेक्षी आणि दुय्यम | श्रमिक, तांत्रिकी व इतर | इतर | |
| १. | सहाय्यक आरोग्य अधिकारी | १ | -- | -- | -- | १ |
| २. | वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी | ३ | -- | -- | -- | ३ |
| ३. | सहाय्यक वैद्यकीय अधिकारी | २६ | -- | -- | -- | २६ |
| ४. | मुख्य लिपिक | -- | २ | -- | -- | २ |
| ५. | लिपिक-नि-टंकलेखिका | -- | -- | -- | -- | -- |
| ६. | लिपिक | -- | २८ | -- | -- | २८ |
| ७. | प्रशितन यंत्र चालक | -- | -- | १ | -- | १ |
| ८. | शिपाई | -- | -- | २ | -- | २ |
| ९. | श्रमिक | -- | -- | ५८ | -- | ५८ |
| १०. | प्रशितन मदतनीस | -- | -- | ३ | -- | ३ |
| | एकूण बेरीज | ३० | ३० | ६४ | -- | १२४ |

## विभाग क्र. ४

## किटकनाशक विभाग

**१. प्रस्तावना:**

दीशक् नियंत्रणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे मुलभूत कार्यतंत्र राबविले जाते. या योजनेअंतर्गत प्रामुख्याने संबंधित चार टप्प्यांचा समावेश होतो.

१) डासांच्या उत्पत्तीस्थानात घट करणे.

२) अभियांत्रिकी उपाययोजना करणे.

३) अळी नियंत्रणाकरिता वापरल्या जाणाऱ्या जीवशास्त्रीय पध्दतीचे अवलंबन करणे.

४) रासायनिक कीटकनाशकांच्या डास अळीनाशक कार्यवाहीसाठी आणि डास कीटकनाशक कामासाठी विनियोग करणे.

अशा प्रकारच्या आरोग्यविषयक कार्यक्रमांतर्गत इतर महानगरांच्या तुलनेत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्रमात असलेला सक्तीचा जनसहभाग हे एक महत्वाचे साधन होय. अर्थातच कायदेशीर कारवाईचे टप्पे हे सदर कार्यक्रमांतर्गत महत्वाचे होत.

**दीशक् प्रजाती**

आपल्या शहरातील हिवतापाच्या स्थानिक प्रसाराकरिता प्रामुख्याने ''ॲनाफेलिस स्टिफेंसी'' ही प्रजाती कारणीभूत ठरते. शास्त्रीय निकषानुसार केलेली किटकनाशकांची औष्णिक धुम्रफवारणी ही दीशक प्रजातीच्या नियंत्रणासाठी महत्वाची पूरक कारवाई असली तरी ती अळीनाशक कारवाईस पर्याय ठरु शकत नाही. सर्वसाधारणत: मात्र हाच पर्याय असल्याचा गैरसमज आहे.

डासांच्या कायमस्वरुपी उत्पत्तीस्थानांची नोंदणी आणि त्यांच्या नित्य तपासणीचा वार्षिक कार्यक्रम ही सदर कार्यक्रमाची व्यवच्छेदकता आहे.

**किटकनाशक खात्याची उद्दीष्टये**

समाजात सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने महत्वाच्या ठरणा-या दिशकजन्य रोगांचे लोकसंख्येतील प्रमाण कमी करुन ते किमान पातळीखाली मर्यादित राखणे जेणेकरुन आजारांच्या प्रमाणात घट होईल आणि वाहकांमुळे होणारे मृत्यू रोखले जातील.

**किटकनाशक खात्याची कार्यपध्दती**

हिवतापवाहक डासनियंत्रणाच्या कामाचे कर्तव्ये हे सर्वसाधारणपणे निरनिराळया राज्यांच्या राज्यशासनाच्या अखत्यारित येते आणि उपद्रवकारक डासनियंत्रणाचे कार्य हे स्थानिक स्वराज्य संस्थेला बंधनकारक असते. मुंबईमध्ये मात्र, बृहन्मुंबई महापालिकेमधील सार्वजनिक आरोग्य खात्याच्या किटकनाशक विभागातर्फे हया दोन्ही समस्या समर्थपणे हाताळल्या जातात.

प्राधान्यक्रमाने (अग्रहक्कक्रमानुसार) किटकनाशक खात्याच्या कार्याची उद्दिष्टे  पुढीलप्रमाणे आहेत –

- हिवतापवाहक डासांचे नियंत्रण
- डेंग्यू / चिकनगुनिया वाहक डासांचे नियंत्रण
- हत्तीरोगवाहक डास नियंत्रण (उपद्रवकारक डासांचे नियंत्रण)
- मक्षिका नियंत्रण
- मूषक नियंत्रण

**शहरी भागातील दिशकजन्य रोग नियंत्रण आराखडा**

हिवताप, डेंग्यू, चिकनगुनिया इत्यादींसारखा दिशकजन्य रोगाचे लोकसंख्येतील प्रमाण कमी करून ते किमान पातळीखाली राखण्यासाठी तीनही प्रजातीच्या डासांच्या नियंत्रणासाठी सुव्यवस्थीत  आणि कालोघात परिक्षित कार्यप्रणाली प्रचलित आहे. म्हणजेच

१)	डासांच्या उत्पत्तीस्थानात घट करणे

२)	अभियांत्रिकी उपाययोजना

३)	जीवशास्त्रीय पध्दतीनुसार अळी नियंत्रण

४)	रासायनिक किटकनाशकांचा वापर

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील पहिले दोन आराखडे उदा.डासांच्या उत्पत्तीस्थानात घट करणे आणि अभियांत्रिकी उपाययोजना करण्यासाठी मनपा अधिनियम १८८८ च्या कलम ३८१, ३८१ ए, ३८१बी व २७१(१ए) अन्वये कायदेशीर उपाययोजनांचा आधार घेतला जातो.

**(अ) हिवतापवाहक डासांचे नियंत्रण**

मुंबईतील हिवताप प्रसाराचा मुख्य वाहक ‘ॲनाफिलिस स्टिफेन्सी’ असून त्याची  उत्पत्ती स्वच्छ साठलेल्या पाण्यात सतत होत असते. मुंबईतील ॲनाफिलिस स्टिफेन्सी डासांची उत्पत्तीस्थाने नैसर्गिक नसून मानव निर्मित आहेत. ॲनाफिलिस स्टिफेन्सी डासांची अनुकूल उत्पत्तीस्थाने मुख्यत: विहिरी, पाण्याच्या टाक्या, कारंजे, शीत मनोरे, बांधकामांची ठिकाणे, हौद इत्यादी आहेत. संपूर्ण मुंबई शहर सहा मुख्य वर्गात विभागले आहे -

१) शासकीय व निमशासकीय मालमत्ता, २) महापालिकेच्या अखत्यारितील मालमत्ता, ३) खाजगी मालमत्ता, ४) बांधकामांची ठिकाणे, ५) पडीक/आजारी गिरण्या आणि ६) झोपडपट्टया.

उपरोक्त ठिकाणी वाहक नियंत्रणाची समस्या हाताळण्यासाठी विविध कार्यपध्दतींचा अवलंब केला जातो.

सदर कार्यतंत्राचा भाग म्हणून शास्त्रीयरित्या करण्यात येणा-या दिशक नियंत्रणासाठी ॲनाफिलिस डासांच्या उत्पत्ती स्थळांची सर्वंकष माहिती परिरक्षित केली जाते. किटकनाशक विभागातील पर्यवेक्षकीय कर्मचारी नियमितपणे क्षेत्रीय कामाची अचानक तपासणी करतात. मुंबई शहरात हिवतापावर नियंत्रण आणण्यासाठी ‘मुंबई मंत्र’- पंचसूत्री कार्यक्रम सन २०११ पासून राबविण्यात येत आहे. हा कार्यक्रम यशस्वीरित्या राबविल्यामुळे मुंबईत हिवतापाचे प्रमाण कमी झाले आहे.

**पंचसूत्री कार्यक्रम**

१) प्रभावी डास नियंत्रण

२) त्वरीत अचूक निदान व पूर्ण उपचार

३) सूक्ष्म आराखडा व रेखांकन

४) म.न.पा.तील खात्यांतर्गत व इतर खात्यांशी समन्वय

५) जनजागृती व प्रशिक्षण (I.E.C. & I.P.C.)

हे 'मुंबई मंत्र' उपक्रम भारत सरकारने सध्या प्रमाणित केले आहेत.

**(ब) डेंग्यू / चिकनगुनिया वाहक डासांचे नियंत्रण**

डेंग्यू व चिकनगुनिया प्रसारक (एडिस इजिप्टाय) डासांवर नियंत्रण ठेवण्यासाठी या डासांची उत्पत्तीस्थाने म्हणजेच घरांमधील व सभोवताली असलेली पाणी साठविणारी भांडी व इतर पाणी साचणा-या वस्तू जसे पाण्याची पिंपे, टायर्स, भंगार-अडगळीचे सामान, डबे, नारळाच्या करवंटया, फेंगशुईची झाडे इ. काढून टाकण्यात येते. तसेच घरात असलेल्या फुलदाण्या, त्या खाली ठेवण्यात येणा-या बशा, शोभिवंत कृत्रिम कारंजी, फेंगशुईची झाडे इत्यादींमध्ये असलेले पाणी आठवडयातून कमीत कमी दोनदा रिकामे करुन, स्वच्छ करुन परत भरण्यासाठी जनजागृती केली जाते. त्याचप्रमाणे खाजगी सदनिकांचे अध्यक्ष/सचिव यांच्याबरोबर सभा घेऊन कामाच्या ठिकाणी आणि व्यावसायिक इमारती, शाळा, औद्योगिक संस्थांसारख्या ठिकाणीही लोकांसाठी जनजागृती कार्यक्रम करण्यात येतात. डेंग्यूवाहक डासांच्या नियंत्रणाकरिता धुम्रफवारणीही केली जाते.

**डेंग्यू आजाराच्या नियंत्रण व प्रतिबंधासाठी मुंबई महानगरपालिकेतर्फे खालील विशेष कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.**

१) सहवासितांचे सर्वेक्षण

२) कामाच्या ठिकाणी तपासणी

३) हाऊसिंग सोसायटी व ए.एल.एम. यांचे समवेत समन्वय

४) आरोग्यविषयक संस्थांशी समन्वय

५) झोपडपट्टी व्यतिरिक्त परिसरांमध्ये विशेष मोहिमा

सन २०१५ मध्ये 'डास उत्पत्ती शोधक' नावाचा एक नवीन कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमात गृहनिर्माण संस्थांमध्ये डेंग्यू आजार पसविणाऱ्या डासांची उत्पत्ती होऊ नये म्हणून गृहनिर्माण संस्थांव्दारे 'डास उत्पत्ती शोधक' यांची नियुक्ती करण्यासाठी त्यांना आवाहन करण्यात आलेले आहे.

कोणत्याही नागरी संस्थेतील कर्मचा-यांना प्रत्येक आठवडयाला घरांतर्गत तपासणी करणे रहिवाश्यांकडून नाकारण्यात येणारा प्रवेश व नागरी संस्थेजवळ उपलब्ध असलेले मनुष्यबळ यामुळे शक्य होत नाही. डास उत्पत्ती शोधकांना बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे डासांची उत्पत्ती संबंधित प्रशिक्षण देण्याची कारवाई करण्यात येत आहे. घरातील वाहक डासांच्या उत्पत्तीस्थानांच्या प्रभावशाली नियंत्रणाकरिता सदर कार्यक्रम अविरतपणे राबविण्याचा किटकनाशक खात्याचा मानस आहे.

**(क) हत्ती रोगवाहक डास नियंत्रण (उपद्रवकारक डासांचे नियंत्रण)**

हत्तीरोगास कारणीभूत असणा-या क्युलेक्स क्वीन क्वीफेसीॲटस डासाची उत्पत्ती सर्व प्रकारच्या दूषित पाण्याच्या जागी म्हणजेच नाले, उघडी गटारे, सेप्टीक टँक, ॲक्वाप्रीव्हीज इ. ठिकाणी होते.

मुंबई शहरामध्ये हत्तीरोगाच्या जंतूंचा, क्युलेक्स जातीच्या डासांमध्ये प्रादुर्भाव (Infectivity) त्याचे रुग्ण बाधित करण्याएवढा नसल्याने, ते डास फक्त उपद्रवकारक ठरतात. उपद्रवकारक (क्युलेक्स) डासांच्या नियंत्रणासाठी छोटया व मोठया नाल्यांच्या ठिकाणी मार्ग (कालवा) काढून तेथे अळीनाशक फवारणी केली जाते. तसेच आच्छादित पर्जन्य जलवाहिन्या व नाले या ठिकाणी धुम्रफवारणी केली जाते व शक्य असेल तेथे अळीनाशकांचीही फवारणी केली जाते.

**(ड) मक्षिका नियंत्रण**

मनुष्याशी फार जवळ असणा-या किटकांपैकी, माशी हा वर्षभर मुबलक प्रमाणात आढळणारा एक किटक आहे. माशी असणे हे अनारोग्याचे द्योतक आहे व त्यांची संख्या ही, अनारोग्य किती प्रमाणात आहे हे दर्शविते. मुंबईत आढळणाऱ्या 'मस्का डोमॅस्टीका' माशीला सर्वसाधारणपणे घरगुती माशी म्हणून ओळखले जाते. तिची उत्पत्तीस्थाने जसे कचराकुंडया, कचरा घरे, कच-याचे ढीग, क्षेपण भूमी, तबेल्यांमधील शेण, मंडईमध्ये सडणा-या भाज्या व इतर गोष्टी इत्यादी आहेत. राहण्याची घरे, खाद्यगृहे, रुग्णालये, गुरांचे गोठे, प्राणीवधगृहे, कचरापेट्या, बाजार इत्यादी ठिकाणी माशा विपुल प्रमाणात असतात. माशी टायफाईड, डायरिया, डिसेंट्री, कॉलरा, ग्रॅस्ट्रोइंट्रायटीस, डोळे येणे (कंजक्टीव्हायटीस) इ. रोग पसरविते. विविध प्रकारच्या किटकनाशकांच्या निरनिराळया फवारण्या करुन माश्यांचे नियंत्रण करणे शक्य होऊ शकते. परंतु, सातत्यपूर्ण नियंत्रण फक्त उत्पत्ती स्थानांचा नायनाट करून व एकंदर पर्यावरणामधील स्वच्छतेमध्ये सुधारणा करून मिळवता येईल. कच-याची पूर्णपणे व योग्य मार्गाने विल्हेवाट लावणे हे मक्षिका नियंत्रणासाठी प्रभावी अस्त्र आहे.

**(ई) मूषक नियंत्रण**

मूषक हा मनुष्याच्या सानिध्यात राहणारा प्राणी असून प्लेग, लेप्टोस्पायरोसिस इत्यादी रोगांच्या प्रसारास कारणीभूत आहे. झिनॉपसिला जातीची पिसवा जी उंदरांच्या केसांमध्ये आढळते ती प्लेग आजाराची वाहक आहे. तसेच मुषकाचे मूत्र हे लेप्टोस्पायरोसिस आजाराच्या प्रसाराचे एक कारण आहे. सतत वाढणा-या पुढच्या दातांना नियंत्रणाखाली ठेवण्यासाठी मुषकाला कुरतडण्याची सवय असते. या सवयीमुळे त्याची विध्वंसकवृत्ती अत्यंत जास्त असते.

मूषकजन्य रोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी मूषक प्रजातींची गणसंख्या कमी ठेवण्यासाठी खालील सूत्रांचा अवलंब करणे अत्यावश्यक आहे.

१) प्रवेश नाकारणे, प्रवेशास अटकाव करणे

२) आसरा न देणे

३) अन्नापासून वंचित ठेवणे

४) नष्ट करणे

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या किटकनाशक शाखेमार्फत मुषकांचे नियंत्रण करण्यासाठी पिंजरे लावून मूषक पकडणे, विष घालून मारणे, बिळांमध्ये वाफारणी करणे व रात्रीच्यावेळी मूषक मारणे इत्यादी कार्यपध्दतींचा अवलंब केला जातो.

**सर्वसाधारणपणे कामाचे वितरण**

प्रत्येक विभाग हा अनेक प्रभागात विभागला जातो. हया प्रभागात कनिष्ठ अवेक्षक अळीनाशक कारवाईचे काम पाहतात. किटक संकलकांचे पथक हे किटकनाशक अधिका-यांच्या थेट पर्यवेक्षणाखाली 'विशेष पथक' म्हणून कार्यरत असते. सदर पथक विभागीय कर्मचा-यांकडून करण्यात येणा-या अळीनाशक कारवाईच्या कामाचे सातत्याने व व्यवस्थितरित्या सर्वेक्षण करते. सदर सर्वेक्षण वाहक डासांचे नियंत्रण करण्यासाठी आणि त्या अनुषंगाने होणा-या आजारांचा उद्रेक टाळण्यासाठी कामाचे नियोजन करणे / काम पार पाडणे याकरिता व आजाराच्या उद्रेकाबद्दल सावधानतेचा इशारा म्हणून उपयोगी पडते. हत्तीरोगाच्या सर्वेक्षणाकरिता किटक संकलक वेगवेगळया ठिकाणी (Fixed and Random collection spots) क्युलेक्स जातीचे उडते डास सुध्दा पकडतात. धुम्रफवारणी दुय्यम निरिक्षक धुम्रफवारणी कामाव्दारे उडते डास नियंत्रण कारवाईचे काम पाहतात. तर मक्षिका नियंत्रणाचे काम फवारणी कामाव्दारे रोगाणुनाशक दुय्यम निरिक्षक पाहतात. एका कनिष्ठ अवेक्षकाकडे मूषक नियंत्रण कार्य सोपविलेले असते. आठवडयातील दिवसांनुसार (सोमवार ते शनिवार) साप्ताहिक डास अळी नियंत्रण कार्यक्रम राबविला जातो.

**किटकनाशक विभागातर्फे सध्या अंमलात आणले जाणारे उपक्रम पुढीलप्रमाणे –**

१. टाक्यांचे निरिक्षण करणे
२. जागांचे निरिक्षण करणे
३. ॲनोफिलीस डासांचा अळीशोध घेणे व उत्पत्तीस्थाने निष्कासित / नियंत्रण करणे
४. उपद्रवी डासांचा अळीशोध (क्युलेक्स) घेणे व उत्पत्तीस्थाने निष्कासित / नियंत्रण करणे
५. एडिस डासांचा अळीशोध घेणे व उत्पत्तीस्थाने निष्कासित / नियंत्रण करणे
६. मक्षिका नियंत्रण करणे
७. मूषक नियंत्रण करणे
८. जीवशास्त्रीय नियंत्रण - डासांच्या नियंत्रणासाठी अळीभक्षक मासे सोडणे
९. छोटया व मोठया नाल्याच्या ठिकाणी मार्ग (कालवा) काढून तेथे अळीनाशक कारवाई करणे
१०. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २४ विभागात २२७ स्कंधविराजित यंत्राव्दारे धुम्रफवारणी करणे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ७ विभागात वाहन विराजित धुम्रफवारणी यंत्राव्दारेसुध्दा धुम्रफवारणी करणे.

११. इमारतींच्या बांधकामाच्या ठिकाणी साठलेल्या/साचविलेल्या पाण्यावर दर आठवडयाला किटकनाशकांची फवारणी करणे व या फवारणीचा खर्च विकासक, बांधकाम ठेकेदार, मालक इत्यादींकडून मनपाने स्विकारलेल्या आगाऊ रक्कमेतून वळती करणे.

१२. पावसाळयात भंगार सामानात (Odd Articles) साचलेल्या पाण्याच्या साठयांवर किटकनाशकांची फवारणी करणे आणि त्या फवारणीचा खर्च भंगार सामान ठेवलेल्या जागेच्या मालकाकडून मनपाने स्विकारलेल्या आगाऊ रक्कमेतून वळता करणे.

१३. प्लेग आजारावरील संनिरिक्षणासाठी किटकनाशक शाखेच्या मूषक विनाशक विभागात उंदरांचे विच्छेदन करणे.

किटकनाशक शाखा नियमित काम करत असताना किटकनाशकांचा व मूषक नाशकांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी प्रयत्नशील असते. तसेच विविध उपकरणे, संयंत्रे इत्यादींच्याबाबतीत माहिती व ज्ञान विकसित करण्यासाठीसुध्दा प्रयत्नशील असते, जेणेकरुन सार्वजनिक आरोग्याच्यादृष्टीने महत्वाच्या दिशक आणि किटक नियंत्रण कामाची गतीही काळानुरुप राबविली जाईल.

## २. उपक्रमांच्या वर्गवारीनुसार वित्तीय आवश्यकता :

(₹ हजारात)

| अ.क्र. | उपक्रमांचे तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|
| अ) | प्रशासकीय आणि पर्यवेक्षक | १,३७,३५,६७ | १,३६,७४,५७ | १,४५,५८,५१ |
| ब) | रोगवाहक आणि किटकनियंत्रण | ३०,४२,६९ | २०,५०,८५ | ३१,३०,१८ |
| | एकूण | १,६७,७८,३६ | १,५७,२५,४२ | १,७६,८८,६९ |

## ३. कार्यानुरुप/उपक्रमानुसार कार्यभार गोषवारा (परिमाणांच्या गणनेत)

| अ. क्र. | उपक्रमांचे तपशील | परिमाणाचे गणन | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष आकडे २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|---|
| १. | सर्वसाधारण प्रशासन आणि पर्यवेक्षण | | सर्वसाधारण प्रशासन आणि आस्थापना कामे | | |
| २. | रोगवाहक आणि कीटकनियंत्रण | साप्ताहिक | | | |
| | अ) परिसर | तपासणी | पूर्व संकल्पित लक्ष्य ठरलेले नसते | ६३३८५४४ | पूर्व संकल्पित लक्ष्य ठरलेले नसते |
| | ब) विहिरी | -''- | -''- | ४ २८६०४ | -''- |
| | क) पाण्याच्या टाक्या | -''- | -''- | २४६९१५६ | -''- |
| | ड) उघडया टाक्या (सिमेंट) | -''- | -''- | २२४३६८ | -''- |
| | इ) कारंजी | -''- | -''- | ३३३७४ | -''- |
| | फ) पावसाळी गटारे | -''- | -''- | ३५६८८७२ | -''- |
| | ग) कापड गिरण्यांचे गावातील तलाव | -''- | -''- | २९६० | -''- |
| | च) एक्वाप्रिव्ही आणि सेप्टीक टाक्या | -''- | -''- | ३५८९०० | -''- |
| | य) गवताळ प्रदेश | -''- | -''- | २३८० | |
| | ज) धुम्रफवारणी फे-या | फेरी | -''- | ३१८७५० | -''- |
| ३. | अळीनाशक कारवाई | | | | |
| | १) पाणवनस्पती काढणे | संख्या | -''- | १० | -''- |
| | २) उघडया गटारांमध्ये अळीनाशक कारवाई | कि.मी. | -''- | ९६६ | -''- |
| ४. | प्रयोगशाळा कार्य | | | | |
| | १. डास पकडण्यासाठी लागलेला कालावधी | तास | पूर्व संकल्पित लक्ष्य ठरलेले नसते | ११०७.३० | पूर्व संकल्पित लक्ष्य ठरलेले नसते |
| | २. पकडलेल्या डासांची संख्या | नर व मादी | -''- | नर- ९९६<br>मादी- ३७५५<br>एकूण- ४७५१ | -''- |
| | ३. विच्छेदन केलेल्या डासांची संख्या | -''- | पूर्व संकल्पित लक्ष्य ठरलेले नसते | ३७५५ | पूर्व संकल्पित लक्ष्य ठरलेले नसते |
| ५. | अ ) मूषक नियंत्रण | | | | |
| | १) तक्रारदाराना पिंजरे पुरविणे | संख्या | -''- | ५१५०९ | -''- |
| | २) विषारी गोळयांचा वापर | -''- | -''- | २२७४० | -''- |
| | ब) रात्रपाळी मूषक संहारक | मारलेल्या मुषकांची संख्या | -''- | २९३८१४ | -''- |

४. **कर्मचारीविषयक गोषवारा (आकडयांमध्ये)**

**कर्मचारीविषयक गोषवारा प्रवर्गानुसार आणि उपक्रमानुसार २०२३-२०२४**

| अ. क्र. | प्रवर्गानुसार कर्मचारी | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष आकडे २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|
| १ | किटकनाशक अधिकारी | १ | १ | १ |
| २ | उपकिटक नाशक अधिकारी | ३ | ३ | ३ |
| ३ | सहा.किटक नाशक अधिकारी | ७ | ७ | ७ |
| ४ | कार्यालय अधिक्षक | १ | १ | १ |
| ५ | मुख्य लिपिक | ६ | ६ | ६ |
| ६ | लिपिक | ४१ | २८ | ४१ |
| ७ | लघु टंकलेखक | १ | - | १ |
| ८ | टंकलेखक | २ | १ | २ |
| ९ | धुम्रफवारणी निरिक्षक | २ | २ | २ |
| १० | किटक नियंत्रण अधिकारी | २४ | २२ | २४ |
| ११ | पर्यवेक्षीय कनिष्ठ अवेक्षक | २३ | २० | २३ |
| १२ | कनिष्ठ अवेक्षक | २२२ | २०५ | २२२ |
| १३ | धुम्रफवारणी दुय्यम निरिक्षक | ३१ | १४ | ३१ |
| १४ | रोगाणूनाशक दुय्यम निरिक्षक | ५४ | १५ | ५४ |
| १५ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ४ | २ | ४ |
| १६ | किटक संकलक | १० | १० | १० |
| १७ | तंत्रज्ञ | १ | १ | १ |
| १८ | जोडारी | १ | -- | १ |
| १९ | शिपाई | ४ | ४ | ४ |
| २० | नाईक | १ | १ | १ |
| २१ | संदेशवाहक | ४ | -- | ४ |
| २२ | मुकादम | १६ | १६ | १६ |
| २३ | वरिष्ठ क्षेत्र कामगार | ११९ | ६४ | ११९ |
| २४ | कामगार | ११५१ | ११५१ | ११५१ |
| २५ | क्षेत्र कामगार | ४३५ | ४३५ | ४३५ |
| २६ | रात्रपाळी मुषक संहारक | ४४ | १३ | ४४ |
| २७ | खारवा | २७ | २७ | २७ |
| | एकूण | २२३५ | २०४९ | २२३५ |

## विभाग क्र. ५

## हिवताप संनिरिक्षण

१. **प्रस्तावना :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सार्वजनिक आरोग्य खाते अंतर्गत संनिरीक्षण (Surveillance) विभागामार्फत संपूर्ण मुंबई शहरातील (ए ते टी विभाग) विविध वस्ती पातळीवर व इमारती मध्ये प्रत्यक्ष भेट देऊन राष्ट्रीय हिवताप नियंत्रण व निर्मूलन करण्याबाबतचे कामकाज पार पाडले जाते.

उप कार्यकारी आरोग्य अधिकारी (संनिरीक्षण) या विभागाचे प्रमुख म्हणून काम पाहतात. संनिरीक्षण खात्यांतर्गत एकूण ९४ पैकी कार्यरत असलेले ६८ संनिरीक्षण निरीक्षक व एकूण ४३२ पैकी सध्या कार्यरत असलेले ३६९ संनिरीक्षण अन्वेषक या पदावरील कर्मचाऱ्यांमार्फत हा राष्ट्रीय हिवताप निर्मूलन कार्यक्रम राबविला जातो. तसेच सहाय्यक पथक अधिकारी हे सदर कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण, मार्गदर्शन व पर्यवेक्षण करून त्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवतात.

संनिरीक्षण विभागातील संनिरीक्षण अन्वेषक व निरिक्षक पदावरील कर्मचारी संपूर्ण मुंबई शहरातील वस्तीमधील प्रत्येक घराघरामध्ये प्रत्यक्ष भेट देऊन संशयित तापग्रस्त रुग्णांचे काचपट्ट्यांवर रक्तसंकलन करून मध्यवर्ती हिवताप तपासणी प्रयोगशाळेमध्ये तपासणीकरिता पाठवितात. सदर प्रक्रियेकरिता संनिरीक्षण विभागामार्फत ए ते टी विभाग आणि इतर दवाखान्यांना मागणीपत्रकानुसार काचपट्ट्या, लँसेट, कापूस, स्पिरीट, बी.एस. रजिस्टर, ग्लास मार्कर पेन, ग्लास किट बॉक्स (१x५०) अशी साधन सामग्री तसेच क्लोरोक्वीन, प्रायमाक्वीन, ए.सी.टी किट ह्या गोळ्या औषधे आवश्यक लेखा शीर्षाअन्वये अनुज्ञेय असलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून खरेदी करून पुरविण्यात येतात. तसेच, विभागात संशयित तापग्रस्त रुग्ण आढळल्यास त्यास तात्काळ औषधोपचार केला जातो व सदर तापाचा प्रसार डासामार्फत वाढू नये म्हणून रुग्ण व त्याच्या नातेवाईकांना आजूबाजूच्या परिसरात स्वच्छता आणि डास प्रतिबंधक उपाययोजना याबाबत मार्गदर्शन करण्यात येते.

संनिरीक्षण विभागातील मध्यवर्ती हिवताप तपासणी प्रयोगशाळेमध्ये एकूण ५५ प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदे असून सध्या कार्यरत २३ पदे आहेत तसेच मध्यवर्ती प्रयोगशाळा व इतर दवाखाने मिळून एकूण ४० मायक्रोस्कोप उपलब्ध आहेत. त्या मायक्रोस्कोप सर्विसिंग व इतर स्पेअर पार्टस दुरूस्ती करिता ई-निविदा प्रक्रियेमार्फत सेवाकरार करण्यात येतो. सदर मायक्रोस्कोप द्वारे ए ते टी विभाग व इतर मनपा दवाखाने मार्फत प्राप्त झालेले संशयित तापग्रस्त रुग्णांचे संकलित केलेले रक्तनमुने तपासणी करण्यात येतात आणि २४ तासांच्या आत अहवाल (Reports)तयार करून रुग्णास त्वरित आवश्यक क्लोरोक्वीन, प्रायमाक्वीन ए.सी.टी किट गोळ्या औषधे देण्यात येतात.

**मलेरिया नियंत्रण कार्यक्रम:**

सध्या हिवताप तपासणी प्रयोगशाळेत अत्याधुनिक तंत्रज्ञानानुसार सूक्ष्मदर्शक यंत्रे (Microscope), मॉनिटर व टॅब साहित्य खरेदी करण्याबाबतची प्रक्रिया सुरू असून काचपट्ट्यांवरील सूक्ष्मजीव अधिक सुस्पष्ट दिसण्याकरिता उच्च तांत्रिकीकरणाची उपकरणे खरेदी करून मध्यवर्ती हिवताप प्रयोगशाळा अद्ययावत व बळकट करण्याची वाटचाल प्रगतिपथाकडे सुरू आहे.

डास उत्पत्तीस्थानांची म्हणजेच छोट्या व मोठ्या नाल्यातील साचलेल्या पाण्यामध्ये तयार झालेल्या अळीनाशक उपाययोजना, इमारतीच्या बांधकाम परिसरातील साठलेल्या पाण्यावर साप्ताहिक प्रक्रिया, वस्तीमध्ये आजुबाजुचा परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत नागरिकांना सूचना देण्यात येतात. अशा प्रकारे हिवताप नियंत्रण कार्यक्रमांतर्गत "त्वरित निदान व योग्य व पूर्ण उपचार" याकरिता आरोग्य केंद्रे व दवाखान्यांमार्फत तसेच संनिरीक्षण अन्वेषक व निरीक्षक पदावरील कर्मचारी विविध वस्तीमधील घरोघरी जाऊन रक्तसंकलन, औषधोपचार आणि प्रभावी डास नियंत्रण उपाय योजनांवर भर दिल्याने मुंबईत मलेरियाचा प्रादुर्भाव कमी करण्यात यश मिळाले आहे आणि सन २०३० पर्यंत मुंबई मलेरिया मुक्त करण्याचा संनिरीक्षण विभागाचा मानस आहे.

सन १९६२ पासून राज्य शासनाच्या मदतीने मुंबई शहराकरिता हिवताप (संनिरिक्षण) कार्यक्रम सुरु करण्यात आला. सन २००७-०८ पासून राज्य शासनाच्या अनुदानाशिवाय सदर कार्यक्रम बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य खात्यांतर्गत हिवताप नियंत्रण कार्यक्रम हा दोन वेगळ्या कक्षांतर्फे कार्यान्वित केला जातो.

(१) किटकनाशक अधिकारी यांच्या विभागातर्फे किटक नियंत्रण, व

(२) उप कार्यकारी आरोग्य अधिकारी (संनिरीक्षण) यांच्या विभागातर्फे परजीवी नियंत्रण.

उप कार्यकारी आरोग्य अधिकारी (संनिरिक्षण) हे या विभागाचे प्रमुख या नात्याने काम पाहतात. उप कार्यकारी आरोग्य अधिकारी (संनिरिक्षण) हे या विभागातील ९४ संनिरीक्षण निरीक्षक व ४३२ संनिरीक्षण अन्वेषक यांच्या मदतीने सहाय्यक पथक अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करुन त्यांच्या कार्यावर नियंत्रण ठेवतात. तसेच हिवताप निर्मूलन कार्यक्रम राबविण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांसह प्रयत्न करतात. हिवताप मध्यवर्ती प्रयोगशाळेत ५५ प्रयोगशाळा तंत्रज्ञ कार्यरत असून २४ विभागातून संकलित केलेल्या तापग्रस्त रक्तनमुन्यांची हिवताप तपासणी २४ तासांच्या आत करण्यात येते. हिवतापाचे उच्चाटन करणे हे या विभागाचे उद्दिष्ट आहे. संनिरिक्षण कर्मचारी वर्षभरात घरांना महिन्यांतून दोन वेळा भेट देऊन हिवतापाविषयी माहिती तसेच उपचार पध्दतीव्दारे जनतेला जागृत करतात.

सन २०१० ला हिवतापाचा उद्रेक झाल्यानंतर मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मुंबई मंत्र हा पंचसूत्री कार्यक्रम राबवून हिवताप नियंत्रण केला गेला. मुंबई मंत्र म्हणजेच –

१. परिणामकारक डासांचे नियंत्रण

२. त्वरित निदान , योग्य ते पूर्ण उपचार

३. सुक्ष्म आराखडा व रेखांकन

४. महानगरपालिका अंतर्गत व बाहय विभागांशी समन्वय

५. जनजागृती व कार्यवाही.

**मलेरिया आणि डेंग्यू नियंत्रण कार्यक्रम**

सध्या हिवताप तपासणी प्रयोगशाळेत अत्याधुनिक तंत्रज्ञानानुसार सुक्ष्मदर्शक यंत्रे (मायक्रोस्कोप) खरेदी करण्यात आली असून अधिक चांगल्याप्रकारे सुक्ष्मजीव तपासणी करण्याचे आणि उच्च तांत्रिकीकरणाची उपकरणे खरेदी करुन मध्यवर्ती प्रयोगशाळा अद्ययावत व बळकट करण्याची वाटचाल सुरु आहे.

डासांच्या कायमस्वरुपी उत्पत्ती स्थानांची नियतकालिक नोंदणी, डासांच्या कायमस्वरुपी उत्पत्ती स्थानी गप्पी मासे सोडणे, छोटया आणि मोठया नाल्यांमध्ये साठलेल्या पाण्यामध्ये अळीनाशक उपाययोजना, इमारतीच्या बांधकाम परिसरातील साठलेल्या पाण्यावर साप्ताहिक प्रक्रिया, जुन्या वस्तूंमध्ये साठलेल्या पाण्यावर किटकनाशकांची फवारणी, धूम्रफवारणी यंत्राद्वारे थर्मल धूम्रफवारणी आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये जनजागृती, ५० महापालिका दवाखान्यांमध्ये डेंग्यू निदानाची सुविधा इ. विविध उपाययोजनांन्वये मुंबई शहरातील डेंग्यू व मलेरिया या रोगांच्या प्रार्दुभावावर नियंत्रण ठेवणे व हिवताप संनिरीक्षण, वस्तीपातळीवर उपचार, समूळ उपचार करणे शक्य झाले आहे.

हिवताप नियंत्रण कार्यक्रमांतर्गत 'लवकर निदान व योग्य उपचार' याकरिता आरोग्य केंद्रे व दवाखाने यांचे लिंकेज आणि घरोघरी जाऊन केले जाणारे रोगाचे संनिरिक्षण या संकल्पनांसह प्रभावी किटकनियंत्रण उपाययोजनांवर भर दिल्याने मुंबईत मलेरियाचा प्रादुर्भाव कमी करण्यात यश मिळाले आहे.

## २.	उपक्रमाच्या वर्गवारीनुसार वित्तीय आवश्यकता

(₹ हजारात)

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|
| १. | सामान्य प्रशासन व पर्यवेक्षण | ३८,८४,०२ | ३७,१५,०० | ३६,९६,७२ |
| २. | तापाच्या रुग्णांचे रक्त नमुने गोळा करुन त्यांची तपासणी व हिवतापबाधित रुग्णांचा शोध (Active Survey) | ३२,४५ | १२,६७ | ४३,१२ |
| ३. | महापालिका दवाखाने व रुग्णालये येथील ताप आलेल्या रुग्णांच्या रक्त तपासणीत आढळलेल्या हिवतापबाधित रुग्णांचा शोध (Passive Survey) | ३२,८० | ३१,७० | ४३,४९ |
| ४. | प्रयोगशाळेत तपासलेल्या रक्ताच्या नमुन्यांची संख्या- | ८२,०० | २८,४८ | ९५,०० |
| | एकूण | ४०,३१,२७ | ३७,८७,८५ | ३८,७८,३३ |

## ३.	कार्यानुरुप/उपक्रमानुसार कार्यभार गोषवारा (परिमाणाच्या गणनेत)

| अ. क्र. | उपक्रमांचे तपशील | परिमाणाचे गणन | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष आकडे २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|---|
| १. | सामान्य प्रशासन व पर्यवेक्षण | | प्रशासन व आस्थापना कार्य | | |
| २. | (अ) एकूण घराचे संनिरीक्षण | घरे | ३९८२२५० | २८५०,००० | ३०००००० |
| | (ब) रक्त नमुने संकलन (ॲक्टीव सर्व्हेलन्स) | -”- | ७९७९८२ | ७५५,८९४ | ८००००० |
| | (क) रक्त नमुने संकलन (मास सर्व्हेलन्स) | -”- | ५३७०६ | ४९५०५ | ५३००० |
| ३. | रक्त नमुने संकलन (पॅसिव्ह सर्व्हेलन्स) | -”- | ४९३१७५ | ५३००८६ | ६००००० |
| ४. | रक्त नमुने तपासण्या | -”- | ५३२७११७ | ४१८५४८५ | ४४५३००० |

४. **कर्मचारीविषयक गोषवारा (आकडयांमध्ये)**

**कर्मचारीविषयक गोषवारा प्रवर्गानुसार आणि उपक्रमानुसार २०२३-२०२४**

| अ. क्र. | उपक्रमांचे तपशील | कर्मचाऱ्यांची उपक्रमानुसार संख्या /उपक्रमाचे संक्षिप्त वर्णन | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स. आ. अ. | व. वै. अ. | स. प. अ. | संनि. निरिक्षक | संनि. अन्वेषक | प्र. तंत्र | लिपिक व तत्सम | श्रमिक | |
| १. | सामान्य प्रशासन व पर्यवेक्षण | १ | १ | ७ | - | - | - | १३ | ८ | ३० |
| २. | घरांना दिलेल्या भेटी | - | - | - | ९४ | ३९२ | - | - | - | ४८६ |
| ३. | रक्त नमुने पॅसिव्ह सर्व्हेलन्स | - | - | - | - | ४० | - | - | - | ४० |
| ४. | रक्त नमुने तपासणी | - | - | - | - | - | ५५ | - | - | ५५ |
| | एकूण | १ | १ | ७ | ९४ | ४३२ | ५५ | १३ | ८ | ६११ |

## विभाग क्र. ६

## स्मशाने आणि विद्युत दहन भूमी

**१. प्रस्तावना:**

मानवी मृतदेहांची योग्य रितीने विल्हेवाट लावण्यासाठी जागा उपलब्ध करुन देणे हे महानगपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्याचे अनिवार्य कर्तव्य आहे.

मानवी मृत शरीरावर अंत्यसंस्कार करण्याच्या वेगवेगळया धर्माच्या पध्दतीनुसार महापालिकेच्या ४८ हिंदू स्मशानभूमी , १७ मुस्लिम दफनभूमी व १० खिश्चन दफनभूमी कार्यरत असून त्यांची देखभाल बृहन्मुंबई महानगरपालिका करते.

तसेच खाजगी २२ हिंदू स्मशानभूमी, ५७ मुस्लिम दफनभूमी, ४२ खिश्चन दफनभूमी व इतर धर्मियांसाठी ५ स्मशाने उपलब्ध आहेत.

जळाऊ लाकडांचा वापर कमी करणे व वृक्ष संवर्धन करणे याकरिता टप्याटप्याने गॅस दाहिन्या सुरू करण्याचा धोरणात्मक निर्णय महापालिकेने घेतलेला आहे.

महानगरपालिकेच्या स्मशानभूमीमध्ये मानवी मृतदेहाची विल्हेवाट लावण्याकरिता परवानगी देणे आणि अंत्यसंस्कार /दफन करण्यासाठी कर्मचा-यांची नेमणूक केलेली असते. प्रेताची विल्हेवाट लावण्यास आलेल्या संबंधित व्यक्तीने मृत्युच्या वैद्यकीय कारणांचे वैद्यकीय प्रमाणपत्र आणि मृत व्यक्ती तसेच मृत्यू संबंधीची तपशिलवार माहिती देणे आवश्यक आहे.

उपकार्यकारी आरोग्य अधिकारी व सहाय्यक आरोग्य अधिकारी यांच्या पर्यवेक्षणाखाली कार्यरत असलेले विभागीय वैद्यकीय आरोग्य अधिकारी त्यांच्या विभागातील जीवनविषयक सांख्यिकी माहिती, जन्म - मृत्यूची नोंद , नागरिकांनी अर्ज केल्यानुसार जन्म-मृत्यूची प्रमाणपत्रे उपलब्ध करणे इत्यादी कामांवर नियंत्रण ठेवतात.

२. उपक्रमाच्या वर्गवारीनुसार वित्तीय आवश्यकता

(₹ हजारात)

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|
| १. | आस्थापना व पर्यवेक्षण | ५७,५८,८९ | ५८,९०,१५ | ८२,१४,२४ |
| २. | स्मशाने | २,६७,५६ | १,५४,६७ | २,००,०० |
| ३. | विद्युत दहन भूमी | २,२३,२४ | १,७६,४५ | २,१५,८४ |
| | एकूण | ६२,४९,६९ | ६२,२१,२७ | ८६,३०,०८ |

३.	कार्यानुरुप/उपक्रमानुसार कार्यभार गोषवारा (परिमाणाच्या गणनेत)

| अ. क्र. | उपक्रमांचे तपशील | परिमाणाचे गणन | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२३ | प्रत्यक्ष आकडे २०२२-२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|
| १. | दफन केलेल्या मृत व्यक्ती | आकड्यांमध्ये | अंदाज वर्तविणे शक्य नाही | १५९४२ | अंदाज वर्तविणे शक्य नाही |
| २. | लाकडावर जाळण्यात आलेल्या मृत व्यक्ती | -”- | -”- | ४३९७४ | -”- |
| ३. | विद्युत दाहिनीवर जाळण्यात आलेल्या मृत व्यक्ती | -”- | -”- | ५६८४ | -”- |
| ४. | दफन केलेली मृत बालके | -”- | -”- | ४२४७ | -”- |
| ५. | गॅस दाहिनीवर जाळण्यात आलेल्या मृत व्यक्ती | -”- | -”- | ८७२७ | -”- |

४.	**कर्मचारीविषयक गोषवारा (आकडयांमध्ये)**
**कर्मचारीविषयक गोषवारा प्रवर्गानुसार आणि उपक्रमानुसार २०२३-२०२४**

| अ. क्र. | उपक्रमांचे तपशील | कर्मचाऱ्यांची उपक्रमानुसार संख्या /उपक्रमाचे संक्षिप्त वर्णन | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | मृत्यू नोंदणी लिपिक व स्मशानभूमी परिचर | तांत्रिक व भट्टीचालक | श्रमिक, माळी व कामगार | |
| १. | स्मशाने | ३९४ | -- | ४४ | ४३८ |
| २. | विद्युत दहनभूमी | ७१ | ५८ | ३ | १३२ |
| | एकूण | ४६५ | ५८ | ४७ | ५७० |

## विभाग क्र. ७

## महानगरपालिका विश्लेषक प्रयोगशाळा

### १. प्रस्तावना :

महानगरपालिका प्रयोगशाळेत मुख्यत: अन्न व पाण्याच्या नमुन्याचे विश्लेषण केले जाते. अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत अन्न व औषध प्रशासन मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वे यांच्याकडून अन्न नमुने घेतले जातात व प्रयोगशाळेत तपासले जातात. प्रयोगशाळेतील अन्न विश्लेषकांनी हे नमुने भेसळयुक्त ठरविल्यास दुकानदाराविरुध्द या कायद्यान्वये न्यायालयात दावे दाखल केले जातात. विभागीय वैद्यकीय अधिकाऱ्यांनी गोळा केलेले पाण्याचे नमुने अणुजीवशास्त्रीय तपासणीसाठी प्रयोगशाळेत येतात. बाहेरील व्यक्ती, दुकानदार व संस्था आपले अन्न व पाण्याचे नमुने तपासणी शुल्क भरुन प्रयोगशाळेत विश्लेषण करुन घेतात. तसेच मध्यवर्ती भांडाराकडून येणाऱ्या साबण, धातु इत्यादी पदार्थांचे विश्लेषण केले जाते.

महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या पोषण आहाराचे नमुने, म्हाडा व इतर संस्थांकडून बांधकामासाठी वापरण्यात येणारे पाणी नमुने, जलतरण तलाव पाणी नमुने, पोलीस ठाण्याकडून येणारे विषबाधित अन्न नमुने व मध्य/पश्चिम रेल्वेच्या अन्न निरिक्षकांनी तपासणीसाठी पाठविलेले अन्न नमुने यांचे विश्लेषण केले जाते.

### २. उपक्रमाच्या वर्गवारीनुसार वित्तीय आवश्यकता

(₹ हजारात)

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२३ | प्रत्यक्ष खर्च २०२२-२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| १. | सामान्य प्रशासन व पर्यवेक्षण | ४,५६,४५ | ४,९१,७५ | ४,८७,०७ |
| २. | अन्न पाणी व मध्यवर्ती भांडाराकडून येणाऱ्या नमुन्यांची तपासणी | ७३,१५ | ६७,१९ | १,१५,८५ |
| | एकूण | ५,२९,६० | ५,५८,९४ | ६,०२,९२ |

### ३. कार्यानुरुप/उपक्रमानुसार कार्यभार गोषवारा (परिमाणाच्या गणनेत)

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | परिमाणाचे गणन | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२३ | प्रत्यक्ष आकडे २०२२-२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रशासकीय व सामान्य | | प्रयोगशाळेचे प्रशासकीय कामकाज पहाणे | | |
| २. | अन्न नमुने | संख्या | ७००० | ८३७४ | ९००० |
| ३. | पाणी नमुने | -"- | ५५००० | ५५४२२ | ६०००० |
| ४. | मध्यवर्ती भांडाराकडून येणारे नमुने | -"- | २० | २० | २५ |

४.	**कर्मचारीविषयक गोषवारा (आकडयांमध्ये)**

**कर्मचारीविषयक गोषवारा प्रवर्गानुसार आणि उपक्रमांनुसार २०२३-२०२४**

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | प्रवर्गानुसार कर्मचारी(आकडयांमध्ये) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रशासकीय व सामान्य | तांत्रिक कर्मचारी | कामगार कर्मचारी | एकूण |
| १. | प्रशासकीय व सामान्य | १७ | --- | ४ | २१ |
| २. | रसायनशास्त्र विभाग | - | २४ | ३ | २७ |
| ३. | अणुजीवशास्त्र विभाग | - | ६ | ३ | ९ |
| | एकूण | १७ | ३० | १० | ५७ |

# <u>विभाग क्र. ८</u>

## धोबीघाट, महालक्ष्मी

**१. प्रस्तावना :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेचा महालक्ष्मी येथे धोबीघाट असून त्यामध्ये एकूण ७३० धुलाई शिळा (Washing Stone) आहेत व त्या धुलाई शिळा मासिक भाडे तत्वावर व्यावसायिक धोबी लोकांना धोबीवाड्यास लागू असलेल्या महानगरपालिकेच्या नियमानुसार दिल्या जातात. धोबीवाड्यातील सर्व धुलाई शिळासाठी (Washing Stone) महानगरपालिकेद्वारे पाणी पुरवठा केला जातो. त्याचबरोबर धोबीघाटाच्या दुरुस्ती व परिरक्षणाचे कामसुध्दा सदर विभागामार्फतच पार पाडले जाते.

**२. उपक्रमाच्या वर्गवारीनुसार वित्तीय आवश्यकता**

(₹ हजारात)

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|
| १. | सामान्य प्रशासन व पर्यवेक्षण | १,०७,६९ | १,१३,७२ | १,४१,०१ |
| २. | धुलाई शिळांचे परिरक्षण | ३,००,७८ | २,५६,३० | ३,००,४८ |
| | एकूण | ४,०८,४७ | ३,७०,०२ | ४,४१,४९ |

**३. कार्यानुरुप/उपक्रमानुसार कार्यभार गोषवारा (परिमाणाच्या गणनेत)**

| अ. क्र. | उपक्रमांचे तपशील | परिमाणाचे गणन | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष आकडे २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|---|
| १. | सामान्य प्रशासन | | सर्वसाधारण प्रशासन आणि आस्थापना कामे | | |
| २. | धुलाई शिळांचे परिरक्षण | संख्या | ७३० | ७०२ | ७३० |

**४. कर्मचारीविषयक गोषवारा (आकडयामध्ये)**

कर्मचारीविषयक गोषवारा प्रवर्गानुसार आणि उपक्रमानुसार २०२३-२०२४ उपक्रमाच्या वर्गवारीत केवळ एकच उपक्रम असल्यामुळे कर्मचारीविषयक गोषवारा दिलेला नाही.

## <u>विभाग क्र. ९</u>

## श्वान नियंत्रण विभाग

**१. प्रस्तावना :**

श्वान अनुज्ञापन आस्थापना मुख्यत: भटक्या कुत्र्यांपासून होणारा उपद्रव रोखण्यासाठी आणि संभाव्य उपद्रव कमी करण्यासाठी कुत्रे पकडण्याची मोहीम नेहमीच्या पध्दतीने राबविण्यासाठी कार्यरत आहे. सदर मोहीम पालिकेच्या एक श्वान पारधी दुय्यम निरिक्षक व पाच श्वान पारधी या कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने शहर, पूर्व उपनगरे व पश्चिम उपनगरे या विभागात प्रत्येकी दोन पाळयात राबविली जाते.

कुत्र्यांपासून होणाऱ्या 'रेबीज' चा धोका असल्यामुळे कुत्र्यांची माणसाला भीती वाटते. त्यामुळे जागतिक रेबीजदिनी मुंबई महापालिकेने रेबीज लसीकरण मोहीम राबवून भटक्या कुत्र्यांना रेबीजचे इंजेक्शन देण्यात येते.

कुत्र्यांना दरवर्षी अॅण्टी रेबीजची लस देणे आवश्यक असते. किमान सलग तीन वर्ष तरी ही लस दिली पाहिजे. म्हणजे रेबीजचा धोका टळतो. पाळलेल्या कुत्र्यांना ही लस दिली जात असली तरी भटक्या कुत्र्यांना मात्र लस देणे आवश्यक असते भटक्या कुत्र्यांच्या नसबंदीचा कार्यक्रम महानगरपालिकेने हाती घेतला असून त्या अंतर्गतही कुत्र्यांना लस दिली जाते.

जागतिक रेबीज दिनी पालिकेच्या पुशवैद्यकीय आरोग्य खात्याच्या वतीने संपूर्ण मुंबईत एक दिवसाची रेबीज लसीकरण मोहीम राबवण्यात येते.

सध्या पालिकेने दि.२६.०१.१९९४ पासून श्वान प्रेमी अशासकीय संस्थांच्या सहकार्याने अंमलात आणलेल्या पध्दतीनुसार मुंबई महानगरपालिका भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांचे निर्बिजीकरण करीत आहे. श्वान निर्बिजीकरण कार्यक्रम हा स्वयंसेवी संघटना, लोकप्रतिनिधी यांच्या सहभागाने युध्दपातळीवर राबविला जातो. सात ते आठ दिवसांच्या कालावधीनंतर त्यांना पुन्हा पकडलेल्या जागेवर नेऊन सोडून देण्यात येते. एकदा निर्बिजीकरण करुन सोडून दिलेल्या श्वानाला पुन्हा पकडण्यात येत नाही. सद्यस्थितीत निर्बिजीकरण कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टीकोनातून स्वयंसेवी संघटनेला सामावून घेण्यात आले आहे. श्वान दंशावर श्वान दंश लस कोणतेही शुल्क न घेता नागरिकांना देण्यात येते. मुंबई उच्च न्यायालयाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार वेडा व रेबीज झालेल्या श्वानास शेवटचा उपाय म्हणून दया मरण समितीद्वारे प्रमाणित केलेल्या श्वानास दया मरण समितीच्या मार्गदर्शनानुसार ठार मारण्याचा निर्णय लेखी स्वरुपात घेण्यात येतो.

श्वानांसाठी परवाने देणे व श्वानांना रेबीज प्रतिबंधक लस देणे इत्यादी सुविधा पुरविण्याचे काम केले जाते. दि.२८.०९.२०२० ते दि.१०.१०.२०२० पर्यंत भटक्या श्वानांच्या रेबीज लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले. सदर कालावधीत मुंबईतील २८८१ भटक्या श्वानांचे रेबीज लसीकरण करण्यात आले. श्वान निर्बिजीकरण शस्त्रक्रीयेचा वेग वाढविण्यासाठी ७ परिमंडळांमध्ये श्वान पकडणारी ७ वाहने मनुष्यबळासहीत पुरविण्यात आली.

## २. उपक्रमांच्या वर्गवारीनुसार वित्तीय आवश्यकता

(₹ हजारात)

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|
| १. | सामान्य प्रशासन व पर्यवेक्षण | ३,७१,९५ | ४,१४,५८ | ८,३३,७९ |
| २. | श्वान विनाश व गाडयांचे परिरक्षण | २,००,३० | ३८,७४ | १०,३० |
| ३. | भटक्या कुत्र्यांना पकडून त्यांचे निर्बिजीकरण करणे, श्वानाचे रेबीज प्रतिबंधक लसीकरण - रेबीज जागृती कार्यक्रम | ६,१२,०० | १,९३,९६ | ३,१२,०० |
| | एकूण | ११,८४,२५ | ६,४७,२८ | ११,५६,०९ |

## ३. कार्यानुरुप/उपक्रमानुसार कार्यभार गोषवारा (परिमाणाच्या गणनेत)

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | परिमाणाचे गणन | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष आकडे २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|---|
| १. | सामान्य प्रशासन | | आस्थापना आणि प्रशासकीय कामे | | |
| २. | (अ) मोहिमांची संख्या | संख्या | ४५०० | २७३५ | ४५०० |
| | (ब) पकडलेल्या श्वानांची संख्या | -”- | ६००० | ५७४५ | ६००० |
| | (क) ठार मारलेल्या श्वानांची संख्या | -”- | --- | --- | --- |
| ३. | (अ) संशोधन संस्थाना श्वानांचा मोफत पुरवठा | संख्या | --- | --- | --- |
| | (ब) खाजगी व्यक्तीस विकलेले श्वान | -”- | --- | --- | --- |
| | (क) सोडलेल्या श्वानांची संख्या | -”- | ५५०० | ३८९४ | ५५०० |
| | (ड) मिळालेल्या तक्रारींची संख्या | -”- | ५००० | ३७५८ | ५००० |
| | (इ) श्वानगृहात ठेवलेल्या श्वानांची संख्या | -”- | --- | --- | --- |
| | (प) नुतनीकरण केलेल्या परवान्यांची संख्या | -”- | ३००० | १८२४ | ३००० |
| | (फ) नवीन श्वान परवान्यांची संख्या | | २००० | १२३८ | २००० |
| ४. | रोग प्रतिबंधक लसीकरण केलेले श्वान | -”- | ३०००० | २२८३९ | ३०००० |

४. **कर्मचारीविषयक गोषवारा (आकडयांमध्ये)**

**कर्मचारीविषयक गोषवारा प्रवर्गानुसार आणि उपक्रमांनुसार २०२३-२०२४**

| अनु.क्र. | प्रवर्गानुसार कर्मचारी | कर्मचाऱ्यांची उपक्रमानुसार संख्या /उपक्रमाचे संक्षिप्त वर्णन | | | | एकूण कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रशासकीय व सामान्य | तांत्रिक कर्मचारी | कामगार कर्मचारी | इतर | |
| १. | श्वान नियंत्रण अधिकारी | -- | १ | -- | -- | १ |
| २. | वरिष्ठ स्वच्छता निरिक्षक | -- | -- | ४ | -- | ४ |
| ३. | मुख्य लिपिक | -- | -- | १ | -- | १ |
| ४. | लिपिक | -- | -- | ५ | -- | ५ |
| ५. | कनिष्ठ अवेक्षक | -- | -- | १७ | -- | १७ |
| ६. | श्वान पारधी दुय्यम निरिक्षक | -- | -- | १३ | -- | १३ |
| ७. | प्रतिवेदन वाहक | -- | -- | -- | ३ | ३ |
| ८. | केनल बिगारी | -- | -- | -- | १२ | १२ |
| ९. | श्वान पारधी | -- | -- | -- | ५५ | ५५ |
| १०. | कामगार | -- | -- | -- | ११ | ११ |
| ११. | शिपाई | -- | -- | -- | ४ | ४ |
| १२. | सफाई कामगार | -- | -- | -- | ३ | ३ |
| १३. | स्कॅव्हेन्जर (मेहतर)/संमार्जक | -- | -- | -- | ३ | ३ |
| १४. | वरिष्ठ अवेक्षक | -- | -- | ५ | -- | ५ |
| १५. | विजतंत्री श्रेणी – २ | -- | -- | १ | -- | १ |
| | एकूण | -- | १ | ४६ | ९१ | १३८ |

## विभाग क्र. १०

## कोंडवाडा विभाग

### १. प्रस्तावना

रस्त्यावर फिरणारी भटकी गुरे वाहतुकीस अडथळा निर्माण करतात व त्यामुळे उपद्रव होतो. कोंडवाड्यांचे कर्मचारी रस्त्यावर फिरणाऱ्या भटक्या गुरांना ताब्यात घेऊन त्यांना महापालिकेच्या कोंडवाडयात ठेवतात. कोंडवाडा कक्षाचे कर्मचारी भटक्या डुकरांनाही ताब्यात घेऊन त्यांना देवनार येथे कत्तलखान्यात जमा करतात. ही कार्यवाही कोंडवाडा अधिकारी व सहाय्यक कोंडवाडा अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली २६ श्रमिक पार पाडतात व त्यासाठी गुरे पकडणाऱ्या दोन वाहनांचा दैनंदिन उपयोग केला जातो.

### २. उपक्रमाच्या वर्गवारीनुसार वित्तीय आवश्यकता

(₹ हजारात)

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|
| १. | सामान्य प्रशासन व पर्यवेक्षण | २,३२,३२ | २,१७,५४ | २,७६,६३ |
| २. | भटक्या गुरांना पकडून कोंडवाडयात टाकणे | १७,२५ | ३,७९ | ३०,९५ |
| | एकूण | २,४९,५७ | २,२१,३३ | ३,०७,५८ |

### ३. कार्यानुरुप/उपक्रमानुसार कार्यभार गोषवारा (परिमाणाच्या गणनेत)

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | परिमाणाचे गणन | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष आकडे २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|---|
| १. | सामान्य प्रशासन व पर्यवेक्षण | | आस्थापना आणि प्रशासकीय कामे | | |
| २. | अ) भटकी गुरे पकडून कोंडवाडयात टाकणे | आकडयामध्ये | ५००० | ३३५ | १००० |
| | ब) देवनार कत्तलखान्यात हस्तांतर केलेली भटकी डुकरे | --"-- | १००० | ६७ | १००० |
| | क) न्यायालयात दाखल केलेली प्रकरणे | --"-- | १००० | ९५ | १००० |

४.      **कर्मचारीविषयक गोषवारा (आकडयांमध्ये)**

**कर्मचारी विषयक गोषवारा प्रवर्गानुसार आणि उपक्रमानुसार २०२३-२०२४**

| अनु.क्र. | प्रवर्गानुसार कर्मचारी | कर्मचाऱ्यांची उपक्रमानुसार संख्या /उपक्रमाचे संक्षिप्त वर्णन | | | | एकूण कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रशासकीय व सामान्य | तांत्रिक कर्मचारी | कामगार कर्मचारी | इतर | |
| १. | कोंडवाडा अधिकारी | १ | -- | -- | -- | १ |
| २. | सहाय्यक कोंडवाडा अधिकारी | ३ | -- | -- | -- | ३ |
| ३. | मुख्य लिपिक | १ | -- | -- | -- | १ |
| ४. | कनिष्ठ अवेक्षक | -- | ६ | -- | -- | ६ |
| ५. | लिपिक | ३ | -- | -- | -- | ३ |
| ६. | शिपाई | -- | -- | २ | -- | २ |
| ७. | श्रमिक | -- | -- | २६ | -- | २६ |
| ८. | श्रमिक नि सफाईगार | -- | -- | ६ | -- | ६ |
| | एकूण | ८ | ६ | ३४ | -- | ४८ |

## विभाग क्र. ११

### कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन

**१. प्रस्तावना :**

महापालिका प्रसुतिगृहामार्फत नागरिकांना प्रसुती सेवा उपलब्ध केली जाते. या व्यतिरिक्त बाल आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण सेवाही उपलब्ध करून दिली जाते. बहुतेक सर्व महानगरपालिका प्रसुतिगृहांमध्ये प्रयोगशाळेची तसेच उपकरणासहीत अद्ययावत शल्यक्रियागृहाची सुविधा उपलब्ध केली आहे. मुंबई शहरामध्ये महानगरपालिकेची ३० प्रसुतिगृहे लोकांच्या सेवेकरिता कार्यरत आहेत.

महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन (भारतीय लोकसंख्या प्रकल्प-५) या उपक्रमानुसार बृहन्मुंबईत म्हणजेच शहर विभागात २४, पूर्व उपनगरात ३९ व पश्चिम उपनगरात ४९ आरोग्य केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. बाह्य रुग्ण द्वार सेवा या कार्यक्रमांतर्गत शहरात २२, पूर्व उपनगरात १५ व पश्चिम उपनगरात १९ आरोग्य केंद्रे तसेच आरसीएच-२ व एनयुएचएम या कार्यक्रमांतर्गत शहर विभागात अनुक्रमे १ व ५, पूर्व उपनगरात अनुक्रमे ७ व ११ आणि पश्चिम उपनगरात अनुक्रमे ७ व १३ अशी एकूण २१२ आरोग्य केंद्रे कार्यान्वित असून सदर ठिकाणी कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन हा सुधारित कार्यक्रम राबविण्यात येत आहे. प्रसुतिगृहांमध्ये पुरविण्यात येणा-या आरोग्य सेवांची दर्जोन्नती करण्यासाठी पूर्व व पश्चिम उपनगरातील प्रत्येक परिमंडळात १ अशा ५ प्रसुतिगृहांची जननी आणि शिशू रुग्णालयाच्या पातळीपर्यंत दर्जोन्नती करण्याचे प्रयास आहे. जेणेकरुन जननी व नवजात शिशू यांना २४ X ७ दर्जात्मक आरोग्य सेवा उपलब्ध होणार आहे.

आरोग्य केंद्रामध्ये उपचारासाठी येणाऱ्या माता व बालकांना पुढील सेवासुविधा देण्यात येतात.

- प्रसुतिपूर्व म्हणजेच गर्भवती स्त्रियांना लोहयुक्त गोळ्या, कॅल्शियमच्या गोळ्या इत्यादी औषधांद्वारे त्यांचे आरोग्य उत्तम राखण्याचा प्रयत्न केला जातो.
- गर्भवती स्त्रियांची वेळोवेळी तपासणी म्हणजे हिमोग्लोबीनचे प्रमाण, वजनात होणारी वाढ, गर्भाची वाढ, टी.टी. इंजेक्शन व वैयक्तिक स्वच्छता यांची पाहणी केली जाते.
- प्रसुतिपश्चात सेवा - १) बाळाचे वेळोवेळी लसीकरण,
  २) कुटुंब नियोजनासंबंधी मार्गदर्शन,
  ३) गर्भनिरोधक गोळ्या व संततिनियमनाच्या साधनांचा पुरवठा,
  ४) तांबी बसविणे.

* स्वंयसेविका व आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यांद्वारे घरोघरी भेट देऊन माता व बालकांचे कौटुंबिक आरोग्य राखणे व कुटुंब नियोजन कार्यक्रम यशस्वीपणे राबविणे तसेच कुटंब नियोजनाच्या दृष्टीने पात्र जोडप्याची सांख्यिकी माहिती , डेमोग्राफिक अहवाल इत्यादी सादर करण्यात आलेले आहे. संपूर्ण महापालिकेतील जन्म-मृत्यू व जन्मत:च मृत्यू पावलेल्यांची सांख्यिकी माहिती, त्याचे विश्लेषण त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या सूचनेनुसार जन्म मृत्यूच्या नोंदणीसाठी सिव्हील रजिस्ट्रेशन सिस्टीम सुरु करण्यात आली आहे. डिस्ट्रीक्ट हेल्थ इनफॉरमेशन सिस्टीम व आरएचएसआयएस हे अनुक्रमे राज्य व केंद्र शासनाचे नविन उपक्रम राबविण्यात आले आहे.
* तसेच कोरोना महामारीच्या कालावधीत कोरोना नियंत्रण व प्रतिबंधासाठी घरोघरी जाऊन संशियत कोरोना रुग्णांचे सर्वेक्षण करणे, जे रुग्ण कोरोना पॉझिटीव्ह असतील त्यांचे विलगीकरण कक्षात हस्तांतर करणे तसेच कोरोना पॉझिटीव्ह रुग्णाच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींचे समुपदेशन करुन त्यांचे अलगीकरण करणे इ. विविध प्रकारची जोखमीची कामे आरोग्य केंद्रांनी पार पाडलेली आहेत.

**२. उपक्रमांच्या वर्गवारीनुसार वित्तीय आवश्यकता :**

(₹ हजारात)

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|
| १. | सामान्य प्रशासन आणि पर्यवेक्षण | ८३,२६,२३ | ८२,९३,०६ | ९६,४४,७७ |
| २. | आंतररुग्ण व बाहयरुग्ण विभागातील रुग्णांची तपासणी व उपचार आणि माता शिक्षण, प्रयोगशाळा तपासणी व पार पाडलेल्या शस्त्रक्रिया | १०,३१,४५ | ७,१८,३५ | १२,१०,९८ |
| ३. | दूध | २,१० | ९० | ३,२७ |
| | एकूण | ९३,५९,७८ | ९०,१२,३१ | १,०८,५९,०२ |

**३. कार्यानुरुप / उपक्रमानुसार कार्यभार गोषवारा** (परिमाणाच्या गणनेत)

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | परिमाणाचे गणन | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष आकडे २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|---|
| १. | सामान्य प्रशासन व पर्यवेक्षण | | प्रशासकीय कामकाज करणे | | |
| २. | आंतररुग्ण व बाहयरुग्ण अभ्यागतांची - रुग्णांची तपासणी व उपचार आणि माता शिक्षण व पार पाडलेल्या शस्त्रक्रिया | | | | |
| | अ ) प्रसुतिपूर्व रुग्ण संख्या | रुग्ण संख्या | अंदाज वर्तविणे शक्य नाही | ३४८०४ | अंदाज वर्तविणे शक्य नाही |
| | ब ) रुग्ण प्रसूती संख्या | -”- | -”- | १४३१२ | -”- |
| | क ) पार पाडलेल्या शस्त्रक्रिया | -”- | -”- | ८९४८ | -”- |

४. **कर्मचारीविषयक गोषवारा** (आकडयांमध्ये)

**कर्मचारीविषयक गोषवारा प्रवर्गानुसार आणि उपक्रमानुसार २०२३-२०२४**

| अ. क्र. | प्रवर्गानुसार कर्मचारी | कर्मचाऱ्यांची उपक्रमानुसार संख्या उपक्रमाचे संक्षिप्त वर्णन | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | विभाग १ | विभाग २ | विभाग ३ | |
| १. | वैद्यकीय आणि प्रशासकीय कर्मचारी | १७२ | ४७३ | ३१३ | ९५८ |
| २. | वैद्यकीय शुश्रूषा व तंत्रज्ञ कर्मचारी | | | | |
| ३. | वाहन चालक / शिपाई / श्रमिक व इतर कर्मचारी | १४१ | ३७१ | १६९ | ६८१ |
| | एकूण | ३१३ | ८४४ | ४८२ | १६३९ |

## विभाग क्र. १२

### विषमचिकित्सा दवाखाने

**१. प्रस्तावना** :

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे प्राथमिक स्तरावरील आरोग्य सेवा पुरविणारे १८६ दवाखाने आणि २१२ आरोग्य केंद्रे, आरोग्य यंत्रणा अधिक सोयींसह अद्ययावत करण्यात आली आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दवाखान्यांचे आधुनिकीकरण आणि दर्जोन्नती करण्यात आली आहे. मुंबईतील नागरिकांना त्यांच्या राहण्याच्या ठिकाणांच्या जवळच मुलभूत स्वरुपाच्या प्राथमिक आरोग्य सेवा पुरविण्याच्या उद्देशाने बृहन्मुंबई महानगरपालिका आपल्या हद्दीमध्ये १८६ दवाखान्यांपैकी दोन दवाखाने दोन सत्रात चालवित आहेत. आणखी १५ दवाखाने ४ ते ११ या वेळेत चालू करणार आहे. दवाखाने दर्जोन्नती कार्यक्रमांतर्गत नागरिकांना त्यांच्या राहण्याच्या ठिकाणाजवळच प्राथमिक स्तरावरील दर्जात्मक आरोग्य सेवा नियमितपणे पुरविण्याचा उद्देश असून यामुळे मोठया रुग्णालयातील रुग्णांची गर्दी काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल. सदर कार्यक्रमाची तीन मुख्य सुत्रे आहेत.

प्रथमत: वैद्यकीय अधिकाऱ्यांना वैद्यकीय कौशल्यामध्ये निष्णांत करणे, तद्नंतर काही विशिष्ट दवाखान्यांच्या रोग निदान मुलभूत सुविधांची व दवाखान्यातील सोयी सुविधांची दर्जोन्नती करुन सर्व दवाखान्यांना समानरुप ( Brand ) देण्यात आले आहे. या दवाखान्यांचे आधुनिकीकरण आणि दर्जोन्नती केल्यामुळे नागरिकांना प्राथमिक स्तरावरील उत्तम आरोग्य सेवा पुरविणे शक्य झाले आहे.

महानगरपालिका सर्वसाधारण दवाखान्यांमध्ये किरकोळ आजाराच्या रुग्णांवर उपचार केले जातात. काही दवाखाने, प्रयोगशाळांच्या सुविधा व दंत चिकित्सालयांच्या सोयींसह अद्ययावत करण्यात आले आहे. महानगरपालिकेत शहर विभागांतर्गत १२, पूर्व उपनगरात ०७ व पश्चिम उपनगरात १२ अशी एकूण ३१ दंत चिकित्सालय आहेत. सर्व दवाखान्यांमध्ये मधुमेहावरील औषधे व इंजेक्शन दिली जातात. नियमित केंद्रावर निदान केलेल्या क्षय रोग्यांना क्षय रोगावरील औषधे व इंजेक्शन दिली जातात. गुप्त रोगावरील उपचाराची सुविधाही काही ठिकाणी उपलब्ध आहे.

**२. उपक्रमाच्या वर्गवारीनुसार वित्तीय आवश्यकता :**

(₹ हजारात)

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|
| १. | विषमचिकित्सा दवाखान्यांमध्ये बाहय रुग्णांच्या करण्यात येणाऱ्या तपासण्या व उपचार प्रयोगशाळा तपासण्या इत्यादी. | १,१९,६७,२१ | १,०९,२६,७३ | १,८०,३६,५२ |
| | एकूण | १,१९,६७,२१ | १,०९,२६,७३ | १,८०,३६,५२ |

### ३. **कार्यानुरुप उपक्रमानुसार कार्यभार गोषवारा** (परिमाणाच्या गणनेत)

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | परिमाणाचे गणन | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष आकडे २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|---|
| १. | विषम चिकित्सा दवाखान्यामध्ये बाहय रुग्णांच्या करण्यात येणाऱ्या तपासण्या व उपचार - प्रयोगशाळा तपासण्या इत्यादी | आकडयांमध्ये | ५०००००० | ४७८९४८४ | ५०००००० |
| २. | नवीन प्रकरणे | -''- | ५०००००० | ४७८९४८४ | ५०००००० |

### ४. **कर्मचारीविषयक गोषवारा** (आकडयांमध्ये)

**कर्मचारीविषयक गोषवारा प्रवर्गानुसार आणि उपक्रमांनुसार २०२३-२०२४**

| अनु. क्र. | प्रवर्गानुसार कर्मचारी | कर्मचाऱ्यांची उपक्रमानुसार संख्या / उपक्रमाचे संक्षिप्त वर्णन | | | एकूण कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | विभाग १ | विभाग २ | विभाग ३ | |
| १. | वैद्यकीय कर्मचारी | | | | |
| २. | औषध निर्माते व तंत्रज्ञ | २२८ | १७५ | १२२ | ५२५ |
| ३. | परिसेविका/प्रयोगशाळा सहाय्यक/नोंदणी सहाय्यक | | | | |
| ४. | श्रमिक/व्रणोपचार/ सफाईगार | १८७ | १५१ | १११ | ४४९ |
| | एकूण | ४१५ | ३२६ | २३३ | ९७४ |

## <u>विभाग क्र. १३</u>

## आयुर्वेदिक व युनानी दवाखाने

**१. प्रस्तावना** :

मुंबई महानगरपालिकेची 'ए' विभाग येथे एक, 'जी/दक्षिण' विभाग येथे दोन व 'के/पूर्व' विभाग येथे एक असे एकूण ४ आयुर्वेदिक दवाखाने असून 'बी' विभाग येथे महानगरपालिकेचा युनानी दवाखाना आहे. सदर दवाखान्यांमध्ये आयुर्वेदिक व युनानी पध्दतीने रुग्णावर उपचार केले जातात.

**२. उपक्रमांच्या वर्गवारीनुसार वित्तीय आवश्यकता :**

(₹ हजारात)

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|
| १. | आयुर्वेदिक व युनानी पध्दतीने रुग्णांच्या तपासण्या व उपचार | २,२२,८६ | १,८०,८० | २,३७,४० |
| | एकूण | २,२२,८६ | १,८०,८० | २,३७,४० |

**३. कार्यानुरुप उपक्रमानुसार कार्यभार गोषवारा** (परिमाणाच्या गणनेत)

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | परिमाणाचे गणन | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष आकडे २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|---|
| १. | आयुर्वेदिक दवाखान्यामध्ये बाहय रूग्णांच्या करण्यात येणाऱ्या तपासण्या | आकडयांमध्ये | पूर्व संकल्पित लक्ष्य ठरलेले नसते | ८१८३६ | पूर्व संकल्पित लक्ष्य ठरलेले नसते |
| २ | युनानी दवाखान्यामध्ये बाहय रूग्णांच्या करण्यात येणाऱ्या तपासण्या | | पूर्व संकल्पित लक्ष्य ठरलेले नसते | ७९९०० | पूर्व संकल्पित लक्ष्य ठरलेले नसते |

## ४. **कर्मचारीविषयक गोषवारा** (आकडयांमध्ये)

**कर्मचारीविषयक गोषवारा प्रवर्गानुसार आणि उपक्रमांनुसार - २०२३-२०२४**

| अ. क्र. | प्रवर्गानुसार कर्मचारी | कर्मचाऱ्यांची उपक्रमानुसार संख्या उपक्रमाचे संक्षिप्त वर्णन | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | विभाग १ | विभाग २ | विभाग ३ | |
| १. | प्रशिक्षित वैद्य | ३ | १ | -- | ४ |
| २. | प्रशिक्षित हकीम | २ | -- | -- | २ |
| ३. | औषध निर्माता | ६ | १ | -- | ७ |
| ४. | व्रणोपचारक | ४ | १ | -- | ५ |
| ५. | श्रमिक | ४ | -- | -- | ४ |
| | एकूण | १९ | ३ | -- | २२ |

## विभाग क्र. १४

## महानगरपालिका लैंगिक संसर्गजन्य रोग चिकित्सालय

**१. प्रस्तावना** :

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे लैंगिक संसर्गजन्य रोग चिकित्सालय हे कामाठीपुरा, १३ वी गल्ली येथे आहे. लैंगिक संसर्गजन्य रोग चिकित्सालय महापालिकेचे एक असे वैशिष्टयपूर्ण चिकित्सालय आहे की, जेथे लैंगिक संबंधातून पसरणाऱ्या संसर्गजन्य रोगांवरच उपचार केले जातात.

**लैंगिक संसर्गजन्य रोग चिकित्सालयाचे विविध विभाग :**

**पुरुष विभाग :**

या विभागात पुरुष रुग्णांची वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तपासणी, आधुनिक प्रयोगशाळेत तपासण्या व अद्ययावत औषधोपचार केले जातात. तसेच प्रभावी उपचारांकरिता प्रतिबंधात्मक व लैंगिक स्वास्थाकरिता वैयक्तिक समुपदेशन या सर्व सुविधा माफक शुल्क आकारून (फक्त रुपये दहा) पुरविल्या जातात.

**स्त्री विभाग :**

या विभागात पुरूष विभागाप्रमाणेच स्त्रियांना, विशेषत: देहविक्री व्यवसायातील महिलांना वरील सर्व सुविधा माफक शुल्क आकारून (फक्त दहा रुपये) पुरविल्या जातात. सदर दवाखाना देहविक्री करणाऱ्या व्यवसायातील या उपेक्षित घटकाला सर्व समावेशक वैद्यकीय सुविधा पुरविण्याकरिता वेश्यावस्तीच्या मध्यवर्ती भागात कार्यरत आहे. कारण हा घटक इतर ठिकाणी भेदभावपूर्वक वागणूक व उपेक्षेमुळे स्वत:च्या आरोग्याबद्दल हेळसांड करताना दिसतो. या विभागात पुरविण्यात येणाऱ्या सर्व सुविधा महिला कर्मचाऱ्यांद्वारेच पुरविल्या जातात.

**संदर्भ प्रयोगशाळा :-**

लैंगिक संसर्गजन्य रोगाच्या निदानासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व चाचण्या या प्रयोगशाळेत केल्या जातात. एकात्मिक समुपदेशन व रक्त तपासणी केंद्राकडून येणाऱ्या रक्त नमुन्याचे एच.आय.व्ही.साठी परिक्षण केले जाते. येथे महानगरपालिकेच्या विविध उपनगरीय रुग्णालये, प्रसुतीगृहातून येणाऱ्या रक्त नमुन्यांची व्ही.डी.आर.एल.तपासणी सुधारित राष्ट्रीय मायक्रोस्कोपी सेंटरमध्ये मोफत केली जाते. सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण (आर.एन.टी.सी.पी.) कार्यक्रमांतर्गत क्षयरोगाकरिता थुंकीची तपासणी येथील डेझिग्नेटेड मायक्रो स्कोपी सेंटर मध्ये मोफत केली जाते.

**एकात्मिक समुपदेशन व रक्त तपासणी केंद्र :**

मुंबई जिल्हे एड्स नियंत्रण संस्थेद्वारे दोन केंद्र चालविण्यात येतात, त्यात एक आय.सी.टी.सी. केंद्र व दुसरे एस.टी.आय. केंद्र आहे. या विभागात स्वच्छेने रक्त तपासणीकरिता येणाऱ्या व्यक्ती, विविध सामाजिक संस्था, खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांच्याद्वारे पाठविण्यात आलेल्या व्यक्ती आणि या चिकित्सालयाच्या पुरुष व स्त्री विभागाकडून येणाऱ्या रक्त नमुन्यांची एच.आय.व्ही. साठी रक्त तपासणी व समुपदेशन मोफत केले जाते.

**लैंगिक संसर्गजन्य रोग चिकित्सालयात पुरविण्यात येणाऱ्या सेवा :**

१. गुप्तरोग उपचार प्राथमिक प्रतिबंध

२. गुप्तरोग, एच.आय.व्ही./एड्स प्रतिबंध व नियंत्रण

३. निरोध वापरास प्रोत्साहन व मोफत वाटप.

४. विभिन्न सरकारी /खाजगी सेवाभावी संस्थांना प्रशिक्षण, सर्वेक्षण व संशोधन कार्यात सहकार्य.

५. एकात्मिक समुपदेशन व रक्तचाचणी केंद्र

६. वार्षिक सेंटिनल सर्व्हेलन्स केंद्र

**२. उपक्रमांची वर्गवारी वित्तीय आवश्यकता :**

(₹ हजारात)

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|
| १. | सर्वसाधारण प्रशासन आणि आस्थापना | २,४८,३८ | २,४८,४५ | २,६७,४६ |
| २. | लैंगिक संसर्गजन्य रोगाने आजारी असलेल्या रुग्णांवर उपचार व तपासणी | २०,०० | १५,७० | २२,४० |
| | एकूण | २,६८,३८ | २,६४,१५ | २,८९,८६ |

## ३. **कार्यानुरुप उपक्रमानुसार कार्यभार गोषवारा** (परिमाणाच्या गणनेत)

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | परिमाणाचे गणन | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष आकडे २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|---|
| १. | सर्वसाधारण प्रशासन आणि आस्थापना | आस्थापना आणि प्रशासकीय कामे | | | |
| २. | बाह्यरुग्ण विभाग | | | | |
| | अ) नवीन | रुग्णांची संख्या | ३००० | ४८०२ | ५००० |
| | ब) जुने | -''- | ९००० | ५५६० | ९००० |

## ४. **कर्मचारीविषयक गोषवारा** (आकडयांमध्ये)

**कर्मचारीविषयक गोषवारा प्रवर्गानुसार आणि उपक्रमांनुसार २०२३-२०२४**

| अनु. क्र. | प्रवर्गानुसार कर्मचारी | कर्मचाऱ्यांची उपक्रमानुसार संख्या / उपक्रमाचे संक्षिप्त वर्णन | | | | एकूण कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब | क | ड | |
| १. | सर्वसाधारण प्रशासन आणि आस्थापना | १ | १ | १ | -- | ३ |
| २. | वैद्यकीय | १ | १ | ५ | १ | ८ |
| ३. | निम वैद्यकीय | ९ | ३ | ४ | २ | १८ |
| ४. | कामगार, तांत्रिक आणि इतर | २ | ११ | ३ | ३ | १९ |
| | एकूण | १३ | १६ | १३ | ६ | ४८ |

## विभाग क्र. १५

### जनगणना

**१. प्रस्तावना :**

जनगणना हे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे ऐच्छिक कर्तव्य आहे. त्यासाठी आवश्यकतेप्रमाणे कर्मचारीवृंद नेमला जातो.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील जन्म मृत्यू नोंदीप्रमाणे शहरातील दिव्यांग (अपंग) व्यक्तींची नोंदणी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर करण्यासाठी सुविधा उपलब्ध करणे. जीवनशैली निर्देशांक (Liveability Index) काढण्यासाठी सार्वजनिक आरोग्य खात्याशी संबंधीत आवश्यक माहिती संकलित करणे.

प्रधानमंत्री राष्ट्रीय स्वास्थ सुरक्षा अभियाना अंतर्गत क्षेत्रिय काम व डाटा एन्ट्री काम करणे.

जनगणना २०२१ च्या प्रात्यक्षित कामास १ मे २०२० पासून सुरुवात होणार होती. परंतु कोविड - १९ संसर्गित रोगाचा वाढता प्रादुर्भाव असल्याने जनगणना २०२१ पुढे ढकलण्यात आली आहे.

**२. उपक्रमांच्या वर्गवारीनुसार वित्तीय आवश्यकता**

(₹ हजारात)

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष खर्च २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|
| अ. | जनगणना २०११ मुंबई | ७,२१,०० | -- | ७,२१,०० |
| | एकूण | ७,२१,०० | -- | ७,२१,०० |

**३. कार्यानुरुप/उपक्रमानुसार कार्यभार गोषवारा (परिमाणाच्या गणनेत)**

| अनु. क्र. | उपक्रमांचे तपशील | परिमाणाचे गणन | अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२०२३ | प्रत्यक्ष आकडे २०२२-२०२३ | अर्थसंकल्पीय अंदाज २०२३-२०२४ |
|---|---|---|---|---|---|
| अ. | जनगणना -२०११ | लोकसंख्या | -- | * १,२४,४२,३७३ | -- |
| ब | बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील जन्म मृत्यू नोंदणीप्रमाणे पार पाडलेल्या दिव्यांगांच्या सर्वेक्षणात शहरातील दिव्यांग (अपंग) ची नोंदणी करणे | लोकसंख्या | पूर्व संकल्पित लक्ष्य ठरलेले नसते | अंध- २४८४<br>कर्णबधीर – ४५५७<br>अस्थिव्यंग- १६११४<br>मतिमंद - ७२३३ | पूर्व संकल्पित लक्ष्य ठरलेले नसते |

* जनगणना – २०११ नुसार अधिकृत आकडेवारी
* महाराष्ट्र शासनाने जाहीर केल्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेची लोकसंख्या -१,२४,४२,३७३

**४. कर्मचारीविषयक गोषवारा (आकडयांमध्ये)**

**कर्मचारीविषयक गोषवारा प्रवर्गानुसार आणि उपक्रमांनुसार २०२३-२०२४**

उपक्रमाच्या वर्गवारीत केवळ एकच उपक्रम असल्याने कर्मचारीविषयक गोषवारा दिलेला नाही.

**सही /-**

**कार्यकारी आरोग्य अधिकारी**